



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६४ वे | * अंक २७५ | * नांदेड | * मंगळवार, दि. १४ ऑक्टोबर २०२५ | * पृष्ठे ६ | * किंमत २ रुपये | ☎ : 255777, Fax :252211


# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत युती झाली पाहिजे; युती न झाल्यास मित्रपक्षांवर कोणीही टीका करू नये

## भाजपच्या बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांच्या कार्यकर्त्यांना सूचना

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यात आगामी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत युती होण्यासाठी आपण प्रयत्नशील आहे. युती न झाल्यास कोणीही मित्रपक्षांवर टीका करू नये, अशा सुचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्यकर्त्यांना बैठकीत दिल्या.

महानगरपालिका जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपरिषद नगरपंचायत या निवडणुका होऊ घातल्या आहेत. या निवडणुकीच्या अनुषंगाने आढावा घेण्यासाठी या बैठकांचं सत्र सुरु आहे. यापूर्वी मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्र हे चार विभागातील बैठका पूर्ण केल्या आहेत असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी संपूर्ण राज्याच्या विभागात दौरे लावल्याचे फडणवीस म्हणाले. ज्या इंदिराजींनी संघावर बंदी घातली, त्यांना सत्तेवरुन पायउतार व्हावं लागल्याचे फडणवीस म्हणाले.

सायंकाळी नागपूर विभागाचा आढावा घेण्यात येईल. पुढील आठवड्यात मुंबई विभागाचा देखील आढावा घेणार असल्याचे फडणवीसम्हणाले. निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांची मानसिकता चांगली आहे. पार्टी देखील सज्ज आहे.



आढाव्यामध्ये कार्यकर्त्यांना दिशा निर्देशके देऊन सूचना केल्याचे फडणवीस म्हणाले.

युती संदर्भात देखील सूचना देतो आहे. युती झाली पाहिजे अशा आमच्या सूचना आहेत. युती झाली नाही तरी मित्र पक्षावर कोणीही टीका करु नये अशा प्रकारचे निर्देश देण्यात आल्याचे फडणवीस म्हणाले. होऊ घातलेल्या निवडणुकीत महायुतीला घवघवीत यश मिळेल असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

यापूर्वी अनेक वेळा संघावर बंदी घालण्याचा प्रयत्न झाला. ज्या इंदिराजींनी संघावर बंदी घातली, त्यांना सत्तेवरुन पायउतार व्हावं लागलं. संघ एक सांस्कृतिक शक्ती आहे. एक देशभक्त अशा प्रकारचा संघटन आहे. राष्ट्रीय विचाराने प्रेरित मूल्यदिष्ट मानव निर्मितीचा कार्य संघ करतं. प्रसिद्धीसाठी ज्या प्रकारचे पत्र देतात त्याकडे आम्ही बघत सुद्धा नाही असे मुख्यमंत्री म्हणाले.

## तारखा जाहीर! यंदा दहावी, बारावीची परीक्षा लवकर

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये होणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षा दोन आठवडे लवकर घेण्याचा निर्णय घेतला आहे. यावर्षी १२ वी आणि १० वी दोन्ही परीक्षांचे वेळापत्रक आगाऊ घोषित करण्यात आले आहे.

बारावीचीलेखीपरीक्षामंगळवार, १० फेब्रुवारी २०२६ ते बुधवार, १८ मार्च २०२६ या कालावधीत होणार आहे. यामध्ये माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान विषयांच्या ऑनलाईन परीक्षा देखील समाविष्ट आहेत.तर, दहावीची लेखी परीक्षा शुक्रवार, २० फेब्रुवारी २०२६ ते बुधवार, १८ मार्च २०२६ दरम्यान घेण्यात येणार आहे.

शासनाच्या परिपत्रकानुसार, बारावीच्या प्रात्यक्षिक, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा २३ जानेवारी ते ९ फेब्रुवारी २०२६ दरम्यान होणार आहेत. दहावीच्या प्रात्यक्षिक, श्रेणी व अंतर्गत मूल्यमापन तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा २ फेब्रुवारी ते १८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान होतील.

# नांदेड जिल्हा परिषद गट सदस्यांचे आरक्षण जाहीर

## सर्वच राजकीय पक्षाचे पदाधिकारी लागणार कामाला



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा परिषद सदस्य आरक्षण सोडतीचा कार्यक्रम सोमवार, दि. १३ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवन सभागृहात पार पडला. याबाबतची माहिती उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) अजय शिंदे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

जिल्हा परिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाने १ ऑक्टोबर २०२५ अन्वये आरक्षण कार्यक्रम दिल्याप्रमाणे नांदेड जिल्हा परिषदेच्या एकूण ६५ निवडणूक विभागाच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम सोमवारी पार पडला. त्यानुसार निवडणूक विभागास आरक्षण निश्चितत करण्यात आले आहे. नांदेड जिल्हा परिषदेतील निवडणूक विभागनिहाय आरक्षणाचा तपशील तालुकानिहाय पुढीलप्रमाणे.

**माहूर :** १-वाई बा.- सर्वसाधारण, २-वानोळा- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग.

**किनवट :** ३-सारखणी- अनुसूचित जमाती, ४-मांडवी- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्री), ५-गोकुंदा- सर्वसाधारण, ६-बोधडी बु.- अनुसूचित जमाती (स्त्री), ७- जलधारा- अनुसूचित जमाती, ८-इस्लालपूर- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्री).

**हिमायतनगर :** ९-सरसम (बु)- अनुसूचित जमाती (स्त्री), १०-पोटा बु.- सर्वसाधारण (स्त्री).

**हदगाव :** ११-निवघा (बा)- अनुसूचित जाती (स्त्री), १२-रूई धा.- सर्वसाधारण (स्त्री), १३-मनाठा- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्री), १४-पळसा- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, १५-आष्टी- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, १६-तामसा- अनुसूचित जमाती.

**अर्धापूर :** १७-लहान- सर्वसाधारण, १८-मालेगाव- सर्वसाधारण (स्त्री), १९-येळेगाव- सर्वसाधारण (स्त्री).

**नांदेड :** २०-वाजेगाव- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्री), २१-वाडी बु.- सर्वसाधारण, २२-लिंबगाव- अनुसूचित जाती, २३-धनेगाव- सर्वसाधारण (स्त्री), २४-बळीरामपूर- अनुसूचित जाती.

**मुदखेड :** २५-बारड- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, २६-मुगट- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग.

**भोकर :** २७-पाळज- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग,२८-भोसी- अनुसूचित जमाती (स्त्री), २९-पिंपळढव- सर्वसाधारण.

**उमरी :** ३०-गोरठा- सर्वसाधारण (स्त्री), ३१-तळेगांव- अनुसूचित जाती.

**धर्माबाद :** ३२-करखेली- सर्वसाधारण, ३३-येताळा- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग.

**बिलोली :** ३४-आरळी- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, ३५-सगरोळी- सर्वसाधारण (स्त्री), ३६-लोहगांव- सर्वसाधारण, ३७-अटकळी- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्री).

**नायगांव (खै.) :** ३८-बरबडा- सर्वसाधारण (स्त्री), ३९-कुंटूर- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्री). ४०-मांजरम- अनुसूचित जाती (स्त्री), ४१-नरसी- अनुसूचित जाती (स्त्री).

**लोहा :** ४२-सोनखेड- सर्वसाधारण, ४३-वडेपूरी- सर्वसाधारण (स्त्री), ४४-उमरा- सर्वसाधारण, ४५-सावरगांव न.- सर्वसाधारण, ४६-कलंबर बु.- सर्वसाधारण (स्त्री), ४७-माळाकोळी- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्री).

**कंधार :** ४८-शिराढोण- सर्वसाधारण, ४९-कौठा- अनुसूचित जाती (स्त्री), ५०-बहाद्दरपुरा- सर्वसाधारण (स्त्री), ५१-फुलवळ- सर्वसाधारण (स्त्री), ५२-पेठवडज- सर्वसाधारण, ५३-कुरूळा- सर्वसाधारण.

**मुखेड :** ५४- जांब बु.- अनुसूचित जाती, ५५- चांडोळा- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्री), ५६- एकलारा- सर्वसाधारण, ५७-येवती- अनुसूचित जाती, ५८-सावरगाव पि.- अनुसूचित जाती (स्त्री), ५९-बाऱ्हाळी- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्री), ६०-मुक्रामाबाद- सर्वसाधारण (स्त्री).

**देगलूर :** ६१-खानापूर- अनुसूचित जाती (स्त्री), ६२-शहापूर- अनुसूचित जाती, ६३-करडखेड- अनुसूचित जाती (स्त्री), ६४-मरखेल- सर्वसाधारण (स्त्री), ६५- हाणेगाव- सर्वसाधारण.

# नांदेड पंचायत समिती गणासाठी आरक्षण जाहीर

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** आगामी होणाऱ्या नांदेड पंचायत समितीसाठी आता नव्याने दोन जागा वाढल्या असून दहा जागांसाठी आता निवडणुका होणार आहेत. त्या अनुषंगाने नांदेड येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आगामी पंचायत समिती निवडणुकीसाठी गणनिहाय आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. यापुर्वीच पंचायत समिती नांदेडचे सभापती आरक्षण नागरीक मागास प्रवर्गासाठी सुटले आहे. सोमवारी आरक्षण सोडतीनंतर अनेक गणांत इच्छुकांचे स्वप्न भंगले तर काहींना खुशी तर काहींना गम झाले आहे.

नांदेड पंचायत समितीअंतर्गत नांदेड तालुक्यातील दहा गणांचा समावेश असून यावेळी दोन गण वाढले आहेत. त्यात धनेगाव व तुप्पा या गणांचा समावेश आहे. पंचायत समिती सभापती यावेळेस आरक्षण नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी सोडण्यात आले आहे. तर दहा पंचायत समिती गणांसाठी आरक्षण सोडत जिल्हाधिकारी नांदेड कार्यालय येथे सोमवार, दि. १३ ऑक्टोबर रोजी आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली आहे. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या जिल्हा परिषद व पंचायत समिती कार्यालय अधिकाऱ्यांसह विविध पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शनिवारी झालेल्या आरक्षण सोडतीमध्ये कासारखेडा - सर्वसाधारण (महिला), वाजेगाव सर्वसाधारण, मरळक बु. - सर्वसाधारण, वाडी बु. अनुसूचित जाती (महिला), लिंबगाव - (महिला), रहाटी बु. - नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), तुप्पा - सर्वसाधारण, बळीरामपूर अनुसूचित जाती, विष्णुपूरी - सर्वसाधारण (महिला) असे आरक्षण जाहीर झाले आहे. सभापतीपदाचे आरक्षण नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी आरक्षीत असल्याने दोन गणातून निवडून येणारा हा सभापती होणार असल्याने आरक्षण सोडतीनंतर 'कही खुशी, कही गम' अशी अवस्था संभाव्य उमेदवारांची झाली आहे.

# विषारी कफ सिरपचा वाढता विळखा, यवतमाळमध्ये ६ वर्षीय चिमुकल्याचा संशयास्पद मृत्यू

**यवतमाळ (प्रतिनिधी)–** मध्य प्रदेशात चिमुकल्या लेकरांचे मृत्यूकांड घडवण्यासाठी जबाबदार असलेल्या विषारी कफ सिरपमुळे साद्याप देशभरात चिमुकल्यांचे मृत्यू तांडव सुरु असल्याचे चित्र आहे. अशातच यवतमाळ जिल्ह्याच्या कळंब तालुक्यातील पिंपळखुटी येथील शिवम सागर गुरनुले या ६ वर्षीय बालकाचा देखील खोकल्याचे औषध घेतल्यानंतर मृत्यू झाला आहे. शिवमवर एका खासगी रुग्णालयात उपचार सुरु होते. यावेळी अचानक प्रकृती बिघडली असता त्याला शासकीय रुग्णालयात रेफर केलं. मात्र यावेळी उपचार दरम्यान त्याचा मृत्यू झाला आहे. अन्न व औषध विभागाकडून मेडिकलमधून पाच औषधाचे नमुने सध्या घेण्यात आले असून आता अहवालाची प्रतीक्षा आहे. अहवालाअंती यातील मृत्यूचे कारण कळू शकणार आहे.

यवतमाळच्या कळंब तालुक्यातील पिंपळखुटी येथील ६ वर्षीय शिवम या बालकाचा सर्दी खोकल्याची औषध घेतल्यानंतर मृत्यू झाला. त्यानंतर अन्न व औषधी प्रशासन विभागाचे सहायक आयुक्त मिलिंद काळेश्वरकर यांनी माहिती देताना सांगितले की, वसंतराव नाईक जिल्हा शासकीय रुग्णालयाकडून बुधवारी एक पत्र प्राप्त झाले. जिल्हा रुग्णालय बालकाला मृताअवस्थेत आणण्यात आले होते. याची चौकशी केली असता, दोन चार दिवसांपूर्वी त्याला काही सर्दी खोखल्याची औषधी देण्यात आली होती. त्या सात औषधांची यादी प्राप्त झाली होती. त्याची नमुने घेतले आणि ते तपासनीसाठी पाठविले आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून या औषधाचे वापर व वितरण थांबवण्याचे आदेश शासनाने दिले आहे. तपासणीचा अहवाल अद्याप यायचा असून अहवाल आल्यानंतर यातील सत्याता कळू शकेल, अशी माहिती अन्न व औषधी प्रशासन विभागाचे सहायक आयुक्त मिलिंद काळेश्वरकर यांनी दिली.




## भारताला शेवटच्या दिवशी जिंकण्यासाठी हव्या ५८ धावा

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियममध्ये कसोटी सामना सुरू आहे. या सामन्यात जिंकण्यासाठी भारताला शेवटच्या दिवशी ५८ धावांची आवश्यकता आहे. याआधी नाणेफेक जिंकून भारताने फलंदाजीचा निर्णय घेतला आणि पहिल्या डावात पाच बाद ५१८ धावा केल्या. यानंतर भारताने डाव घोषीत केला. नंतर वेस्ट इंडिजने पहिल्या डावात सर्वबाद २४८ धावा केल्या. भारताने फॉलोऑन दिल्यामुळे सलग दुसऱ्यांदा फलंदाजीसाठी आलेल्या विंडीजने नंतरच्या डावात सर्वबाद ३९० धावा केल्या आणि भारतापुढे जिंकण्यासाठी १२१ धावांचे आव्हान ठेवले.

दिल्ली कसोटी सामन्याच्या चौथ्या दिवशी भारत शेवटच्या डावाची फलंदाजी करण्यासाठी मैदानात आला. यशस्वी जयस्वाल आठ धावा करुन वॉरिकनच्या चेंडूवर अँडरसनकडे झेल देऊन परतला. केएल राहुल २५ आणि साई सुदर्शन ३० धावांवर खेळत आहे.




# नांदेड परिक्षेत्रात आता दर शनिवारी 'जनता संवाद' व 'तक्रार निवारण दिन'

## डीआयजी शहाजी उमाप यांचा उपक्रम

## पहिल्या दिवशी ५०८ अर्जांची निर्गती




**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड परिक्षेत्रातील नागरिकांच्या अडीअडचणी समजावून घेऊन त्यांची सोडवणूक करण्यासाठी नांदेड परिक्षेत्रात आता प्रत्येक शनिवारी नागरिकांशी 'संवाद' व 'तक्रार निवारण दिन' आयोजित करण्यात येणार आहे. या उपक्रमाअंतर्गत दि. ११ ऑक्टोबर रोजी ५०८ अर्जांची निर्गती करण्यात आली आहे.

दि. ११ ऑक्टोबर रोजी पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी गंगाखेड पोलीस ठाणे येथे भेट देऊन, गंगाखेड शहर व परिसरातील नागरिकांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी जनतेच्या अडीअडचणी व पोलिसांकडून असलेल्या अपेक्षा समजावून घेतल्या. पोलीस ठाण्याचे विभाजन व नवीन पोलीस ठाण्याची निर्मिती, मनुष्यबळ कमतरता, शहरातील वाहतूक समस्या, सीसीटीव्ही उभारणी, महिला तक्रार निवारण केंद्राची आवश्यकता, स्थानिक गुन्हेगारी व अवैध व्यवसाय इत्यादी बाबींकडे नागरिकांनी त्यांचे लक्ष वेधले. या प्रत्येक अडचणीवर तोडगा काढण्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने सुरू करण्याबाबत शहाजी उमाप यांनी त्यांना अश्वस्त केले.

यावेळी परभणीचे अपर पोलीस अधीक्षक सुरज गुंजाळ, गंगाखेड उपविभागाचे उपविभागीय पोलिस अधिकारी श्री राजेंद्र शिरतोडे, पूर्णा उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी समाधान पाटील, गंगाखेडचे पोलीस निरीक्षक श्रीकांत डोंगरे व नागरिक उपस्थित होते. नागरिकांच्या तक्रारींची शिघ्रतेने दखल घेऊन त्यांची सोडवणूक करण्यासाठी, परिक्षेत्रात पोलीस ठाणे पातळीवर प्रत्येक शनिवारी सकाळी १०.०० ते दुपारी ०१.०० वा. दरम्यान तक्रार 'निवारण दिन' आयोजित करण्यात येणार आहे. सदर दिवशी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी आपापल्या हद्दीतील अर्जदार व गैर अर्जदार यांना बोलावून घेऊन, त्यांच्या तक्रारींची सोडवणूक करणार आहेत. त्याचप्रमाणे, पोलिस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक व उपविभागीय पोलीस अधिकारी हे देखील त्यांच्या कार्यक्षेत्रातील किमान एका पोलीस स्टेशनला उपस्थित राहून तक्रारी सोडवणुकीच्या कामकाजात सहभागी होणार आहेत.

दि. ११ ऑक्टोबर रोजी नांदेड परिक्षेत्रातील नांदेड जिल्ह्यातील २२३ तक्रारी, परभणी जिल्ह्यातील २११, हिंगोली ८ व लातूर जिल्ह्यातील ६६ तक्रारी सोडविल्या आहेत. प्रत्येक शनिवारी आयोजित करण्यात येणाऱ्या या तक्रार निवारण दिवशी, तक्रारदारांना पोलीस ठाणे प्रमुखांसोबतच वरिष्ठ पोलीस अधिकारी देखील उपलब्ध होणार असून, नागरिकांच्या तक्रारी सोडविण्यासाठी ते वेळ देणार आहेत. सदर व्यवस्थेमुळे, नागरिकांना आपल्या तक्रारी सोडवून घेण्यासाठी आठवड्यातील एक दिवस निश्चित झाला असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती देखील सुनिश्चित झाली आहे. प्रत्येक शनिवारी पोलीस ठाणे पातळीवर आयोजित करण्यात येणाऱ्या तक्रार निवारण दिनाचा चांगला उपयोग, नागरिकांनी आपल्या तक्रारींच्या सोडवणुकीसाठी करून घ्यावा, असे आवाहन पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# नक्षलवादाविरोधातील निर्णायक टप्पा?

छत्तीसगडच्या गरियाबंद जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या कारवाईत दहा कट्टर नक्षलवाद्यांचा खात्मा हा केवळ सुरक्षा दलाचा विजय नाही, तर देशाच्या आंतरिक सुरक्षेला लागलेल्या दीर्घकालीन जखमेवर दिलासा देणारा टप्पा आहे. बालकृष्ण ऊर्फ मनोज याच्यासह दहा जणांचा नायनाट झाल्याने नक्षल चळवळीला जबर धक्का बसला आहे. तब्बल एक कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर असलेला हा नक्षलवादी तेलंगणातील वारंगलचा रहिवासी होता. त्याच्या मृत्यूची अधिकृत माहिती खुद्द पोलीस अधीक्षक निखिल राखेचा यांनी दिली. ही कारवाई समजून घेण्यासाठी गेल्या काही महिन्यांतील घडामोडींचा मागोवा घेणे आवश्यक ठरते. मे महिन्यात नारायणपूर-अबुझमाड येथे तब्बल ५० तास चाललेल्या मोहिमेत सुरक्षा दलाने बसवराजू ऊर्फ नंबाला केशव या नक्षलवाद्याच्या खात्म्यात यश मिळवले होते. त्यानंतर पल्लव ऊर्फ देवजी हा संघटनेचा नवीन म्होरक्या म्हणून नेमण्यात आला, तर माडवी हिडमा याच्यावर दंडकारण्य झोनल समितीची जबाबदारी सोपविण्यात आली. हिडमा हा गेली साडेतीन दशके नक्षल चळवळीत कार्यरत असून, त्याच्यावर सहा कोटी रुपयांपेक्षा अधिक बक्षीस आहे. या साखळी घटनां-मधून दिसून येते की, नक्षलवाद्यांचे जुने नेतृत्व संपविण्यात सुरक्षा यंत्रणा यशस्वी होत असली, तरी संघटनेत नवे चेहरे पुढे आणण्याची त्यांची क्षमता अजूनही संपलेली नाही. तथापि, गेल्या दीड वर्षात छत्तीसगडमध्ये झालेल्या कारवायांची आकडेवारी पाहिली तर बदल स्पष्ट दिसतो. दररोज सरासरी सहा नक्षलवाद्यांना अटक केली जात आहे. हे आकडे नक्षलवाद्यांच्या संघटनात्मक घसरणीचे द्योतक आहे. देशपातळीवरही २०२४ मध्ये सुरक्षा दलाने २९० नक्षलवाद्यांचा खात्मा केला. १०९० जणांना अटक केली आणि ८८१ जणांनी आत्मसमर्पण केले. ही सर्व आकडेवारी एक महत्त्वाचा संदेश देते की, नक्षलवाद्यांचा प्रभाव आणि दहशत झपाट्याने कमी होत आहे. असे असले तरी ही समस्या कायमची मिटेल असे म्हणता येत नाही, कारण मुळातच नक्षलवाद का निर्माण झाला याची कारणमीमांसा करून त्याप्रमाणे उपाययोजना करणे गरजेचे आहे. केवळ सुरक्षा रक्षकांच्या बंदुकीच्या धाकावर यावर नियंत्रण आणता येईल असे समजणे योग्य ठरणार नाही. कारण छत्तीसगडसह महाराष्ट्र, झारखंड, तेलंगण, ओडिशा या राज्यांमध्ये पूर्वी नक्षलवादी निर्धोकपणे कारवाया करत. परंतु आता त्यांचे जाळे सुरक्षा दलाच्या दबावाखाली कमकुवत झालेले आहे. स्थानिक लोकांनाही विकासाच्या प्रक्रियेत सामील करून घेतल्यास नक्षलवादाचा पाय आणखी उपटता येईल. कारण नक्षलवादाची मूळ कारणे म्हणजे दारिद्र्य, दुर्लक्षित लोकांचे असंतोष आणि मूलभूत गरजांकडे झालेले दुर्लक्ष. सुरक्षा दलाच्या शौर्यपूर्ण कारवायांना साथ देतानाच शासनाने विकासाच्या उपाययोजना प्रभावीपणे राबविणे अत्यावश्यक आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि पायाभूत सुविधा या क्षेत्रांमध्ये राज्याचा हस्तक्षेप वाढला, तर नक्षलवादाच्या गर्तेत अडकलेले तरुण मुख्य प्रवाहात येतील अन्यथा नवे 'हिडमा' किंवा 'पल्लव' निर्माण होण्याचा धोका कायम राहील. गरियाबंदमधील ताज्या मोहिमेतील यश हे अंतिम समाधान नसून, निर्णायक पायरी आहे. सुरक्षा आणि विकास या दोन्हींच्या समन्वयातूनच नक्षलवादावर कायमस्वरूपी विजय मिळवता येईल. हे युद्ध केवळ बंदुकांच्या गोळ्यांनी नाही, तर विश्वास, न्याय आणि विकास यांच्या माध्यमातून जिंकावे लागेल.

# समस्त युवाशक्तीला राष्ट्रभक्ती कळावी

मानवी शरीर निसर्गाचा एक अद्‌भूत चमत्कार आहे. आपल्या जीवन प्रवासात शरीर आणि आपली इंद्रिये ही अत्यंत महत्त्वाची संपत्ती आहे. ज्या संपत्तीचे मूल्य कधीही पैशात मोजता येणार नाही. सर्व प्रगतीचा तो आरंभबिंदू आहे. या संपत्तीशिवाय होणारी प्रगती मनुष्याला निखळ सुखापर्यंत नेऊ शकत नाही. मनुष्य जीवनाचे अंतिम ध्येय हे निखळ आणि निरागस आनंदात दडलेले आहे. त्यामुळे सशक्त शरीर असेल तर अनेक दुःखावर मात करून सुखाच्या मार्गाकडे वाटचाल करणे. आपल्या ध्येयाची दिशा ठरविणे आणि त्यासाठी अतोनात कष्ट उपसण्याची तयारी ठेवणे शक्य आहे. केवळ इच्छाशक्ती आहे, पण शरीर साथ देत नाही त्या व्यक्तीला त्याच्या आंतरिक इच्छेला लगाम घालावा लागतो.

शरीर संपत्ती मिळविण्यात अपयशी ठरलेले युवक उसळते साहस घेऊन जगण्याच्या ऐन उमेदीत आपल्या आजारांचे कौतुक करीत फिरताना दिसतात. कोणत्याही कार्य कर्तृत्वाचा आनंद घेण्यासाठी असमर्थ ठरलेल्या युवकांना आपले जीवन भकास वाटू लागते. त्यामुळे शरीर ही संपत्ती आहे, ते एक नादमधुर संगीत आहे, तो जीवनातील सर्वोच्च आनंद आहे, नव्हे तो स्वर्ग आहे. शरीराची महती स्पष्ट करताना खूप ज्येष्ठ व श्रेष्ठ विचारवंतांनी हे अनेकदा आपल्यासारख्या पामरांना सांगितले आहे.पण जेंव्हा तरुणाईचे उसळते साहस रोमारोमांत संचार करते. तेव्हा या शरीरधनाची जोपासना करणे, त्यामधून दीर्घायुरोग्य प्राप्त करुन घेणे आणि जीवनप्रवासातील दीर्घायुष्याचा परमोच्च आनंद घेणे या गोष्टीचा आम्हाला विसर पडतो. हे अगदी सहजसाध्य झाले आहे. यासाठी कोणतेही कष्ट घ्यावे लागले नाही. त्यामुळे जीवनातील व्यसनाधीनता, अविचार, वाममार्ग याचे आम्ही एवढ्या सहजपणे समर्थन करतो. त्या समर्थनामुळे भावी जीवनात निर्माण होणाऱ्या संकटाची तमा बाळगण्याची गरज युवकांना वाटली पाहिजे. उसळत्या साहात विचारी बीजे रुजलेली असतील तर ती शक्ती सकारात्मक कार्याच्या दिशेने वाटचाल करेल. दिशाहीन उसळते साहस वाममार्गाच्या दिशेने वाटचाल करीत असेल तर ते शरीरधन युवाशक्तीच्या नाशा-ला कारणीभूत ठरते. युवाशक्तीकडे अत्यंत आशेने पाहणाऱ्या पालकांचा आधार जो युवक होऊ शकत नाही. ते शरीरधन काय उपयोगाचे? आपल्या शक्ती दिशाहीन होणार नाही. हा विचार घेऊनच युवकांची दिनचर्या असली पाहिजे.

मानवी शरीर निसर्गाची अनमोल देणगी आहे. त्याचा उपयोग अविचाराने केल्यामुळे ज्या वेळी शरीर असंख्य व्याधींनी ग्रस्त होते. तेव्हा निर्माण होणारी सद्‌बुद्धी, हे वेळ निघून गेल्यानंतरचे शहाणपण आहे. आपल्या शहाणपणाचा उपयोग योग्य वेळीच करता आला पहिजे. देहमंदिरावर आजाररूपी राक्षसी हल्ले होऊ लागल्यावर आम्ही जागे होतो. त्यानंतर वैद्यकीय इलाज करने सुरू होते. पण एकदा का आजार रूपी हल्ले सुरू झाल्यावर बचावात्मक पवित्रा घेऊन करण्यात येणारे इलाज किती परिणामकारक ठरतील याची शाश्वती देता येत नाही. मनाचे आणि विचारांचे सामर्थ्य कोणत्याही औषधापेक्षा श्रेष्ठ असते. तेंव्हा त्या सामर्थ्याचा विचार आम्हाला केंव्हाच पडता कामा नये.



आपल्या आरोग्यावरच आपले मन, बुद्धी, भावना ह्यांची अवस्था अवलंबून असते. मनाविषयी विचार करताना अंतर्मन व बहिर्मन अशा दोन्ही अवस्थेचा विचार प्रामुख्याने आपल्याला करावा लागेल. दोन्ही मनात सुरू असलेले द्वंद्व हे बरेच वेळा न संपणारे असते. याचे महत्त्वाचे कारण अंतर्मनात सुरू असणाऱ्या आंतरक्रिया बहिर्मनाशी जुळत नाहीत. सारांश आत चालले काय, आणि बाहेर दाखवतो काय? अशी अवस्था प्रामुख्याने बऱ्याच युवकांची आपल्याला दिसते.

दिसणे आणि असणे हे जर प्रामुख्याने वेग-वेगळे असेल तर आपली नेहमीच फसगत होत राहते. हे दिसणे व असणे इतरांची फसवणूक करण्याच्या संदर्भात नसेल तर एक वेळ ते फारसे घातक ठरणार नाही, पण पुढे असा प्रश्न निर्माण होतो की आपण स्वप्रतारणा का करावी? मुक्त, स्वच्छंदी अगदी निर्मळ झऱ्यासारखं का जगता येऊ नये? बहुतांशी अतिसंकोची, अव्यक्त स्वभावाचे युवक मोठ्या प्रमाणात स्वप्रतारणा करून घेतात. त्याचे महाभयंकर दुष्परिणाम ते भोगत असतात.

असणे आणि भासवणे ही एक प्रचंड कला आहे, असे समजणारे अनेक महाभाग असतात. त्यामुळे अगदी सहजपणे बनवाबनवी करण्यात आपण यशस्वी होतो. हा दृढविश्वास असणारे युवक आपल्या जीवनातील विश्वासाहर्ता तर गमावतातच, पण यांच्या अंतर्मनात व बहिर्मनात नेहमीच सुरू असणारे महायुद्ध यांच्या मनोविश्वाचा विध्वंस करीत असते. काही कालावधीची 'अशी ही बनवाबनवी' नेमकी आपल्याला अगदी कडेलोटाच्या शिखरावर कशी घेऊन गेली? त्यानंतर ती आपल्या भवितव्याची 'कशी ही बनवाबनवी' झाली. हे या महान कलाकाराला कळत नाही. जेव्हा कळते, तेव्हा त्या कळण्याचा काहीच उपयोग नसतो, कारण चुकीच्या मनो व्यापारामुळे त्याने माणूस म्हणून जगण्याचा अधिकार केंव्हाच गमावलेला असतो.

युवावस्थेत ही बाब खूप लक्षात घेण्यासारखी आहे, आपण माणूस म्हणून जगण्याचा अधिकार केंव्हाच गमविता कामा नये आपल्या बुद्धीचा होणारा विकास आपल्याला स्वार्थाकडे, कुसंगतीकडे किंवा वाममार्गाकडे नेऊ शकतो, पण आपल्या मनाचा आणि भावनेचा विकास आपल्याला केंव्हाच वाईट दिशेने नेऊ शकत नाही. मन, भावना आपल्याला मानवी शरीरातील यंत्र बनू देत नाहीत. आपल्या अगोदर इतर व्यक्तीच्या सुख-दुःखाचा विचार करायला लावते ते मानवी मन. ते आपल्याला या पर्यावरणातील प्रत्येक जीवसृष्टीचा विचार करायला लावते. पशु,पक्षी, प्राणी, वृक्ष, वल्ली या चराचरात ते आपल्याला आत्मा आणि परमात्म ाचा विचार करायला लावते. जेंव्हा बाल्यावस्थेपासून मानवी जीव हा विचार करायला लागतो. तेंव्हा त्याला वेगळ्या ईश्वरभक्तीची गरज नाही. तो प्रत्येक जीवाशिवातील ईश्वरापर्यंत पोहचतो. तो जीवसृष्टीत एकरूप होतो. तो मानवी जीवनाचा खराआनंद घेतो. इहलोकीचा मोक्ष तोच पाहतो आणि क्षणोक्षणी ईश्वरभक्तीचा आनंद तोच घेतो.

ईश्वर आपले मनोरथ तेंव्हाच पूर्ण करेल जर तुमचा प्रयत्नवादावर पूर्ण विश्वास असेल. माउलीने पसायदानात उल्लेख केला. जो जे वांच्छील तो ते लाहो प्राणिजात पण याचा अर्थ समजून घेतांना केवळ भक्तीने ते प्राप्त होऊ शकणार नाही.त्याला तुमची अपार मेहनत, शक्ती,बुद्धी,नियोजन सर्वच गोष्टीची जोड हवी. ईश्वरभक्ती यासाठी आवश्यक आहे. मला सदविचाराचा व सत्कार्याचा विसर पडू नये. माझ्या मनात राग, द्वेष, कुवासना, ला-लसा निर्माण होऊ नये. इतरांचे सुख, आनंद पाहून माझ्या मनात द्वेष निर्माण होऊ नये. मला माणूस म्हणून आनंदात जगता यावं. प्रत्येक प्रसंगी माझ्या मनात सकारात्मक विचारांचा वास असावा. ईश्वरभक्ती, नामस्मरण यासाठी आहे. ईश्वरभक्तीचे केवळ नाटक करून सर्वसामान्यांची फसवणूक करणारे काही थोडे नाहीत. मनुष्य वर्तनासंबंधी विचार केला असता 'व्यक्ती तितक्या प्रकृती' असणारच. मनुष्यवर्तनासंबंधी निश्चित निष्कर्ष काढणे खूप कठीण आहे. मनुष्यजीवन असंख्य अनिश्चीततेने, संघर्षाने व थोडक्यात युद्धाने भरलेले आहे.

संत तुकाराम महाराज म्हणतात,
रात्रन दिन आम्हा युद्धाचा प्रसंग।।
अंतर्बाह्य जग आणि मन।।

ज्याचा मन आणि भावनांवर ताबा तो जग जिंकू शकतो. त्याला अशक्य असे काही नाही. मन आणि भावना ताब्यात ठेवण्यासाठी आमच्या विचारांची व्यापकता वाढवून मनोनिग्रह करणे आवश्यक आहे. आमच्या युवाशक्तीला विचारांची व मनोनिग्रहाची जोड मिळो व ही शक्ती राष्ट्र कार्याच्या सत्कारणी लागो. हीच सर्व ज्येष्ठांची मनोकामना. या देशातील समस्त युवकांना राष्ट्रभक्तीचे महत्व कळेल, तेंव्हा आमच्या देशाचे भविष्य उज्ज्वल असेल, हे सांगण्यासाठी कोणत्या ही भविष्यवेत्याची गरज असणार नाही.

**-प्रा. वसंत गिरी**
मेहकर, जि. बुलडाणा
मो. ९०११२२९२३२



# ई कचऱ्याविषयी जागरूकता हवी!

आज १४ ऑक्टोबर, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक ई कचरा दिवस म्हणून साजरा केला जातो. ई कचरा कमी करणे आणि ई कचऱ्याचा पुनर्वापर या बाबत जनजागृती करणे हा या दिवसा मागचा उद्देश आहे. २०१८ साली पहिल्यांदा जागतिक कचरा दिवस साजरा करण्यात आला. पर्यावरण आणि मानवी आरोग्यासाठी धोकादायक असलेला ई कचरा ही जगातील आज सर्वात मोठी समस्या बनली आहे. आपल्या रोजच्या जगण्यामध्ये इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल सेवांचा वापर जसा वाढत चालला आहे तसतसा इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा डोंगरही वाढत चालला आहे. उपयुक्तता संपलेल्या आणि तांत्रिक बिघाडामुळे वापरण्यायोग्य नसलेल्या वस्तू फेकून दिल्या जातात आणि मग त्याचा ई कचरा बनतो. फक्त महाराष्ट्राचा विचार केला तर महाराष्ट्रात दरवर्षी ५० हजार टन हून अधिक ई कचरा जमा होतो तर देशात ५ लाख टन ई कचरा वर्षाला तयार होतो. महाराष्ट्र खालोखाल आंध्र प्रदेश, तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यात सर्वाधिक ई कचरा तयार होतो. आपल्या देशातच इतका ई कचरा तयार होत असेल तर जगात किती ई कचरा तयार होत असेल याचा विचार न केलेलाच बरा. ई कचऱ्याची समस्या इतकी गंभीरपणे आ वासून उभी असतानाही आपण ई कचऱ्या विषयी जागृत नाही. काहींना तर ई कचरा म्हणजे काय हे देखील माहीत नाही. ई कचरा म्हणजे तुमच्या आमच्या घरातील निकामी झालेल्या किंवा वापरात नसलेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तू ज्या सहजपणे आपण इतर कचऱ्यासोबत बाहेर फ ेकतो. या कचऱ्याचा निचरा देखील आपण इतर कचऱ्या प्रमाणेच करतो. घरगुती वा-परातील टीव्ही, टेप, रेडिओ, टू इन वन, फ्रिज, मिक्सर, वॉशिंग मशीन, कुलर, एअर कंडिशनर, इलेक्ट्रॉनिक कुकर, मायक्रोव्हेव, ओव्हन, हीटर, पंखे यासारख्या इलेक्ट्रॉनिक वस्तू निकामी झाल्या की त्याला ई कचरा असे संबोधले जाते. यासोबतच महिती तंत्रज्ञान क्षेत्रातील उपकरणे जसे संगणक, लॅपटॉप, टॅब, फोन, मोबाईल, बॅटरी, सर्किट बोर्ड, हार्ड डिस्क, पेन ड्राईव्ह, सिडी, व्ही सिडी यांचा ई कचऱ्यात समावेश होतो. अशा प्रकारे निकामी झालेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंना ई कचरा असे म्हणतात. इलेक्ट्रॉनिक वस्तूंमध्ये भरपूर प्रमाणात सजीवांना अपायकारक घटक असतात. हे अपायकारक घटक पर्यावरणातील हवा, मती आणि पाण्यात मिसळले की सभोतालची हवा, पाणी आणि माती दूषित होती. मोबाईलची किंवा कोणत्याही बॅटरीची निर्मिती शिसे वापरून केली जाते. हे शिसे पावसाच्या पाण्यात झिरपून हवेतील आर्द्रतेम ध्ये मिसळून संबंधित हवा, पाणी आणि दूषित होते. अमेरिकेतील एका पर्यावरण संवर्धन संस्थेच्या म्हणण्यानुसार दरवर्षी ३० दशलक्ष संगणक निकामी झाले की फेकून दिले जातात. यापैकी वीस टक्क्यांहून कमी संगणकाचे पूनर्विनिकरण केले जात नाही. युरोपमध्ये तर दरवर्षी सुमारे १०० दशलक्ष फोन फेकून दिले जातात. कालबाह्य ठरलेली, निकामी झालेली ही उपकरणे पर्यावरणातील जागा वेगाने व्यापत आहेत. निष्काळजीपणे फेकलेल्या काही उपकरणांमध्ये बोरोलियम, कॅडीमियम, पारा आणि शिसे यासारखी घातक घटक असतात. या घटकांना वातावरणात संमिश्र होण्यास अवकाश लागत असला तरी खूप जास्त प्रमाणात जेंव्हा हे वाता-वरणात मिसळले जातात तेंव्हा पर्यावरणाची मोठी हानी होते. एकूणच ई कचऱ्यामुळे पर्यावरणाची मोठी हानी होत आहे. हे लक्षात घेता ई कचऱ्याच्या समस्येवर वेळीच आणि गांभीर्याने विचार करण्याची नितांत गरज आहे. ई कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी विशिष्ट प्रक्रिया अवलंबणे आवश्यक आहे. त्याचा निचरा इतर कचऱ्यासोबत न करता त्याचा निचरा करण्यासाठी भिन्न प्रक्रिया राबवली पाहिजे. ई कचऱ्याचे नियोजन आणि विल्हेवाट लावण्याच्या प्रक्रियेत या कचऱ्याचे संकलन त्याचे रिसायक्लिंग आणि त्याचे मॅन्यूफॅक्चरिंग महत्वाचे आहे. त्यासाठी सार्वजनिक व खाजगी क्षेत्राने संयुक्त रुपात पायाभूत सुविधा उभाराव्या लागतील. पर्यावरण मंत्रालयाने सादर केलेल्या ई कचरा व्यवस्थापन नियम २०२२ च्या मसुद्यात ई कचरा व्यवस्थापनामध्ये उत्पादक, पुनर्वापर संस्था आणि संघटना सर्वांची जबाबदारी निश्चित केली गेली आहे. ती जबाबदारी प्रत्येक घटकाने पार पाडल्यास काही प्रमाणात ही समस्या मिटेल.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# विवाह करताय; चांगला विचार करा!

अलिकडे न्यायालयात घटस्फोटाचे खटले दाखल होत आहेत. खटले वाढत असून निकालाच्या मानानं खटल्याची संख्या जास्त आहे. या खटल्यातील वादाचा विषय असते सासू. सासू मोठी खास्ट आहे असं कारण पुढं करीत न्यायालयात खटले दाखल होत असतात. तसं पाहता अलिकडील काळ बदललेला आहे व काही काही घरात सासवांना बराच त्रास सहन करावा लागत आहे.

पूर्वीचा काळ असा नव्हता. त्या काळात सासवा बदमाश असत असं आजच्या काळातील लोकांचं म्हणणं. परंतु त्या काळातीलही अपवादात्मक दोनचार जर सोडल्या तर काही सासवा खऱ्याच चांगल्या होत्या. मग सासवा खास्ट असतात. त्या चांगल्या नसतात असा सासवांचा इतिहास बदनाम करणारा का पुढे आला असावा? त्याचं कारण होतं बालविवाह.

आई......आपली आई आपल्याला प्रिय असते. कारण ती आपली आई असते. त्यातच तिनं आपल्याला कितीही त्रास दिला तरी तो त्रास आपल्याला त्रास दिल्यासारखा वाटत नाही. कारण ती आपली आई असते. एखाद्या वेळेस आपण आपल्या आईचं एखादं काम जर केलं नाही तरी आई रागावते व आपल्याला मारते. तेव्हा आपल्याला तिचा तात्पुरता राग येतो. मग काही वेळानं तो राग आपण विसरुन जातो. त्याचा राग आपण आपल्या मनात धरुन ठेवत नाही. परंतु त्याचवेळेस जर ती आपली आई नसेल, दुसरं कुणीही असेल आणि ती व्यक्ती आपल्यावर कितीही प्रेम करीत असेल तरी त्या व्यक्तीचा आपल्याला राग येतो. तीच गोष्ट पुर्वी आपल्याला सासवाच्या बाबतीत घडून आलेली दिसते.

पूर्वी बालविवाह व्हायचे व ते बालवय असायचं आणि त्या बालवयात विवाह व्हायचे. तसं पाहता त्या बालवयात तसे बालविवाह झाल्यानंतर ते खेळण्या बागडण्याचं वय असतांना सासू तिला घरची कामं सांगायची नव्हे तर ती कामं करीत असतांना जर ती चुकलीच तर तिला ती सम जावून सांगायची. त्यातच ती अशी कामं करीत असतांना ती सारखी चुकत असेल तर तिला रागवायची. तसं त्या सुनेचं वय,लहान असल्यानं तिला ते मारायचीही. जशी आजची आपली आई आपल्याला मारते तशी. तसं पाहता त्या सासुनं तसं मारताच तिला राग यायचा. जसा आजच्या काळात आपल्याला कोणी मारत असेल तर राग येतो तसा. याच रागावरुन व मारण्यावरुन सासू बदनाम झाली पुर्वीच्या काळी. काही दिवस जाताच हे मारणे जेव्हा ती समजदार होत असे. तेव्हा लक्षात येत असे व तेव्हा तीव्र राग मनात राहात असे.



आज काळ बदलला. या बदलत्या काळानुसार सासू सुनेच्या व्यवहारात बदल झाला. सासू सून झाली व सून सासू. आता सासूवर सून अत्याचार करती झाली. परंतु ज्या घरातील मुलगा आपल्या आईवर आपल्याच पत्नीकडून होणारा अत्याचार सहन करु शकला नाही. तेव्हा वाद झा-लेत व असे वाद झालेत की ज्याचं रुपांतरण चक्क घटस्फोट व न्यायालयातील खटल्यात झालं. कारण कायद्याचं अलिकडील काळात पत्नीला अभय दिल्या गेलं आहे.

कायदे बनले हे अभ्यास करुनच. परंतु ते कायदे बनवितांना कदाचीत घराघरातील परिस्थिती लक्षात घेतलेली नसावी. वरवर परिस्थिती पाहून कायदे बनले असावेत. कारण प्रत्येक घरातील परिस्थिती सारखी नसते. काही घरात प्रेम असतं तर काही घरात प्रेम, जिव्हाळा याला थारा नसतो. उदाहरणार्थ एखादी सावत्र आई एखाद्या बाळाला स्वतःच्या मुलासारखी वागणूक देवू शकते. तर काही सावत्र आई काही काही बाळांना सावत्रपणा-चीच वागणूक देत असतात. हे नाकारता येत नाही. तेच घडलं असेल कायदे बनवितांना. कायदे बनले देशातील विपरीत परिस्थिती पाहूनच. त्याचा सखोल अभ्यास केला त्यांनी. परंतु असा सखोल अभ्यास करीत असतांना प्रत्येक घरातील वातावरण वेगळं असते याची जाणीव न ठेवून कायदे बनल्यानं आज घराघरातील वातावरण तंग अशा स्वरुपाचं आहे व आज अशाच तंग वातावरणातून आलेल्या गैरसमजुतीतून न्यायालयात खटले दाखल होत आहेत व त्या खटल्यात वाढ होत आहे.

महत्वपुर्ण गोष्ट ही की प्रत्येक सुनेनं आज आपल्या सासूला समजून घेण्याची गरज आहे. तिनं तिला आपली आईचं मानावं. तिला बदनाम करु नये. कारण आज तो काळ गेला की ज्या काळात बालविवाह होत व अगदी अल्पवयात घरी आलेल्या मुलीला सर्व करतब शिकविण्याचे काम सासू नावाची त्या काळातील आई शिकवीत असे. ती तिला सर्व गोष्टीत पारंगत करीत असे. जो साधारण आजच्या काळातील महिलांना अत्याचार वाटत असतो. आज त्याच महिलेनं समजून घ्यावं आपल्या सासूला. तसं पाहता आज काळ बदलला नाही. काळ तोच आहे. फरक एवढाच आहे की आजच्या काळात महिलांचे बालविवाह होत नाहीत व आजच्या काळात जे विवाह होतात. ते विवाह ती समजदार झाल्यावर होतात. त्यामुळं सासू जर एखादी चांगली गोष्ट सांगत असेल तर ती आपल्याला सहजासहजी स्विकारता येत नाही. स्विकारण्यात समस्या निर्माण होतात. म्हणूनच घटस्फोट, अत्याचार ह्या साऱ्या कटकटी वाटतात. कारण आजच्या काळात वय वाढलेले आहे विवाहाचे व या वाढत्या वयात आपलं काहीही चुकत असल्यास वा त्यावर कोणीही काही सुचना करीत असल्यास त्या सुचना आपल्याला आवडत नाहीत. त्या सुचना वारंवार केल्यास आपल्याला राग येतो व तशी आपल्याला आपल्याच हितासाठी कोणी अक्कल सुचविलेली आवडत नसल्यानं आपली भांडणं होत असतात.

नवीन सुन, मग ती कितीही वयाची का असेना, घरामध्ये नवीनच नांदायला येतांना तिला तसा फारसा अनुभव नसतोच. तो अनुभव सासूला नक्कीच असतो. शिवाय नवीन घर. नवनवीन व्यक्ती, नवीन परीसर, नवीन शेजारी, रोजच नवनवीन लोकांशी येणारा संपर्क हा नवीनच असतो व त्या लोकांशी जुळवून घेणे ह्या गोष्ट काही एकाच दिवशी शक्य होत नाहीत. त्यासाठी बराच कालावधी जावा लागतो. परंतु आपला स्वभाव हा उतावीळ असतो. तो उतावीळ बनलेला असतो. कारण आपल्या मायबापानं आपले फारच लाड पुरविलेले असतात. शिवाय अशा उतावीळ स्वभावाने त्या नवीनच वातावरणात आपण स्वतः ला दिडशहाणे समजत असल्यानं व आपल्या मायबापानं तसं आपल्याला सांगीतलं असल्यानं आपल्यासमोर नवीन लोकांनी काही सुचविलेलं आपल्याला खपत नाही व ती सुचना करणे म्हणजे आपल्याला अत्याचार वाटतो. त्यातूनच घटस्फोटासारखे प्रसंग निर्माण होत असतात.

विशेष सांगायचं म्हणजे आपले वय जरी वाढले असेल अन् वाढत्या वयात आपण समजदार जरी झालो असेल तरी आपण स्वतःला शहाणे समजू नये. तरच संसार टिकतो. आपण समजदार असल्यानं आपल्यावर कोणीही आजच्या काळात अत्याचार करु शकत नाहीत. काही जण सुचनाही करतात. त्या सुचना समजून घ्याव्या. त्याचा बाऊ करु नये. तरच संसार टिकेल. तसा तो टिकवावा. अन् ज्याला तसं वागायचं नसेल. संसार टिकवायचा नसेल, तर त्याचा त्यांनी आधीच विचार करावा. त्यानं विवाहही करु नये व संसारात पडू नये. व्यतिरिक्त संसारात पडून कुणाचं जीवन उध्वस्त करु नये म्हणजे झालं.

**-अंकुश शिंगाडे**
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# ज्ञानतीर्थ युवक महोत्सव : दिलखेचक लावणी सादरीकरणाने विद्यार्थी मंत्रमुग्ध

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या ज्ञानतीर्थ युवक महोत्सव सोमवारी (दि.१३) पारंपरिक लावणी सादरीकरणाने गाजला. मंच क्रं. एक क्रांतिवीर बिरसा मुंडा मंचावर लावणी हा कलाप्रकार सादर करण्यात आला. अगदी पारंपारिक लावण्यापासून ते बैठकीच्या लावण्यापर्यंत विद्यार्थ्यांनी लावल्या सादर केल्या. विशेष म्हणजे मुलींनी तर लावण्या सादर केल्याच पण काही हौशी मुलांनीही लावण्या सादर केल्या.



'पारवा घुमतय कसं, अगंबाई पारवा घुमतय कसं', अहो सांगा राया, सांगा मी कशी दिसते? माझ्यावरती रसिक जणांच्या नजरा, दिलबरा करिते तुला मुजरा', 'माढीवरती उभे राहूनही वाट पाहिली, काल वाटलं होतं तुम्ही याल राया, वाटलं होतं तुम्ही याल', 'पोटासाठी नाचते मी पर्वा कुणाची', 'कुण्या गावाचं आलं पाखरू, अहो कुण्या गावाचं आलं पाखरू. बसलंय डौलात खुदु खुदु हसतंय गालात' अशा अनेक बहारदार लावण्या विद्यापीठ परीक्षेत्रातील चारही जिल्ह्यांमधील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सादर केल्या. उपस्थित विद्यार्थ्यांनी तर टाळ्या आणि शिट्ट्या वाजून प्रतिसाद दिला.

या कार्यक्रमाचा आनंद घेण्यासाठी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरु डॉ.अशोक महाजन, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. डी. एन. मोरे, अधिसभा सदस्य यांच्यासह अनेक प्राध्यापक गुरुजन वर्ग उपस्थित होते. मंच क्रं. एकवर सल्लागार मंडळ सदस्य डॉ. प्रताप देशमुख, डॉ. बालाजी भंडारे, डॉ. बालाजी सूर्यवंशी, डॉ. गजानन पाटील, डॉ. एम. आर. जाधव, डॉ. कमलाकर चव्हाण यांनी धुरा सांभाळली आहे.

याशिवाय सोमवारी मंच क्रं. दोनवर विडंबन अभिनय आणि एकांकिका चालू आहेत. मंच क्रं. तीनवर शास्त्रीय तालवाद्य व शास्त्रीय सूरवाद्य चालू आहेत. त्याचबरोबर समूह गायनही होणार आहे. मंच क्रं. चारवर वक्तृत्व स्पर्धा व वादविवाद स्पर्धा पार पडणार आहेत. मंच क्रं. पाचवर स्थळ छायाचित्रण, मेहंदी, चित्रकला, पोस्टर मेकिंग इत्यादी कला प्रकारांचे सादरीकरण होत आहे.

दि.१४ रोजी हा युवक महोत्सवाचा तिसरा दिवस. सकाळी मंच क्रं. एकवर जलसा, आदिवासी नृत्य व लोकनृत्याचे सादरीकरण होणार आहे. तर मंच क्रं. दोनवर शास्त्रीय नृत्य, नक्कल आणि एकांकिचे सादरीकारण होणार आहे. मंच क्रं. तीनवर समूह गायन, शास्त्रीय गायन होणार आहेत. मंच क्रं. चारवर वादविवाद कथाकथनाचे सादरीकरण होणार आहे. मंच क्रमांक पाचवर मृदमूर्ती कला, रांगोळी, कलात्मक जुळवणी इत्यादी स्पर्धा पार पडणार आहेत.

## किनवट पालिकेच्या प्रारूप मतदार यादीत गंभीर चुका : नेम्मानीवार यांची तक्रार

**किनवट (प्रतिनिधी)–** किनवट पालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारूप मतदार यादीत गंभीर व अक्षम्य चुका आहेत. त्या चुका दुरुस्त करून निर्दोष यादी प्रसिद्ध करावी, अशी मागणी काँग्रेस पक्षाचे किनवट शहराध्यक्ष गिरीश नेम्मानीवार यांनी केली आहे.

याबाबत निवडणूक आयोगाकडे पाठवलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, किनवट पालिका निवडणुकीसाठी प्रसिद्ध झालेल्या प्रभागनिहाय मतदार व लोकसंख्या यात विसंगती आहे.प्रभाग १ ची लोकसंख्या २ हजार ६८३ असताना प्रारूप यादीत २ हजार ७४१ मतदार दाखविण्यात आले आहेत. प्रभाग २ ची लोकसंख्या २ हजार ६५३ यादीत २ हजार ६७५ मतदार दाखविण्यात आले आहेत.प्रभाग ३ ची लोकसंख्या २ हजार ७८५ असताना यादीत दोन हजार १६९ मतदार दाखविण्यात आले. प्रभाग ४ ची लोकसंख्या २ हजार ६०३ असताना येथे २ हजार ८८८ मतदार दाखविण्यात आले.प्रभाग ५ ची लोकसंख्या २ हजार ५८९ असताना येथे १ हजार ७९१ मतदार दाखवले आहेत.प्रभाग ६ ची लोकसंख्या २ हजार ७४२ असताना या प्रभागात दोन हजार ३५२ मतदार दाखविण्यात आले.प्रभाग ७ ची लोकसंख्या २ हजार ६६६ असताना या प्रभागात २ हजार ५७५ मतदार दाखविण्यात आले.प्रभाग ८ ची संख्या २ हजार ६८४ असताना या प्रभागात १ हजार ७७४ मतदार दाखविण्यात आले.प्रभाग ९ ची संख्या २ हजार ८०२ असताना येथे २ हजार पाचशे मतदार दाखविण्यात आले. तर प्रभाग १० ची संख्या ४ हजार २४२ असताना या प्रभागात ३ हजार २७४ मतदार दाखविण्यात आले आहेत. या आकडेवारीवरून प्रारूप यादीत गंभीर चुका असल्याचे दिसून येत आहे.सर्व प्रभागांची पुनर्तपासणी करून लोकसंख्येच्या प्रमाणात योग्य ती दुरुस्ती करावी, प्रभाग १० मधील मतदारांची नांवे प्रभाग ६ मध्ये समाविष्ट झाल्याचा गोंधळ दूर करावा, अन्यथा भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्यावतीने जनआंदोलन छेडण्याचा इशारा गिरीश नेम्मानीवार यांनी दिला आहे.

## बिलोली पंचायत समितीच्या ८ गणांची आरक्षण सोडत जाहीर

- सभापती पद सर्वसाधारण महिलासाठी राखीव
- आरळी व कासराळी गणात होणार काट्याची टक्कर

**बिलोली (प्रतिनिधी) –** येथील पंचायत समितीच्या आठ गणांच्या सदस्य पदाच्या आरक्षणाची सोडत दि.१३ ऑक्टोबर रोजी येथील पंचायत समितीच्या सभागृहात जाहीर करण्यात आली. या सोडतीत आठ पैकी चार गण महिलांसाठी आरक्षित करण्यात आले आहे. विषेश म्हणजे सभापती पद हे सर्वसाधारण महिलेसाठी आरक्षित झाल्यामुळे कासराळी व आरळी या दोन सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षित झालेल्या पंचायत समिती गुणांमध्ये सभापतीपद डोळ्यासमोर ठेवून काट्याची लढत होणार आहे.

बिलोली पंचायत समिती अंतर्गत असलेल्या पंचायत समितीच्या आठ गणांची आरक्षण सोडत दि.१३ ऑक्टोबर रोजी नियंत्रण अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी क्रांती डोंबे, प्राधिकृत अधिकारी तथा तहसीलदार गजानन शिंदे, नायब तहसीलदार दीपक मरळे यांच्यासह तहसील व पंचायत समितीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत एका लहान मुलाच्या हस्ते चिठ्ठी काढून आरक्षण निश्चित करण्यात आले. निश्चीत करण्यात आलेल्या आरक्षणाप्रमाणे गण क्रमांक ६७ गागलेगाव (सर्वसाधारण), गण क्रमांक ६८ आरळी (सर्वसाधारण महीला), गण क्रमांक ६९ बडूर (अनुसूचित जाती), गण क्रमांक ७० सगरोळी (अनुसूचित जमाती), गण क्रमांक ७१ कासराळी (सर्वसाधारण महीला), गण क्रमांक ७२ लोहगाव (ना. मा. प्र ), गण क्रमांक ७३ रामतिर्थ (ना. मा. प्र. महीला), गण क्रमांक ७४ अटकळी (अनुसूचित जाती महीला) याप्रमाणे ८ ही गणांचे आरक्षण निश्चित करण्यात आले.

विषेश म्हणजे गेल्या दोन दिवसांपुर्वी पंचायत समितीचे सभापती पद हे सर्वसाधारण महीलेसाठी आरक्षित झाल्यामुळे तालुक्यातील आरळी व कासराळी या सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षित झालेल्या पंचायत समिती गणांमध्ये पंचायत समितीचे सभापती पद डोळ्यासमोर ठेवून काट्याची लढत होणार असून साधारणपणे या दोन गणातुन निवडून येणाऱ्या महिलांपैकी एक महिला सभापती होण्याची शक्यता असल्याने या दोन्ही गणांकडे सर्वच राजकीय पक्षांसह नागरिकांचेही लक्ष राहणार आहे.

## नांदेड-अनकापल्ली-नांदेड विशेष गाडीच्या १४ फेऱ्यांचे नियोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रवाशांची गर्दी पाहता दक्षिण मध्य रेल्वे हुजूर साहिब नांदेड ते अनकापल्ली दरम्यान विशेष गाडीच्या १४ फेऱ्या चालविणार आहे. गाडी क्रं. ०७०३७ हुजूर साहिब नांदेड - अनकापल्ली, मंगळवार १४ ऑक्टोबर ते २५ नोव्हेंबर दरम्यान आणि गाडी क्रमांक ०७०३८ अनकापल्ली - हुजूर साहिब नांदेड बुधवारी १५ ऑक्टोबर ते २६ नोव्हेंबर २०२५ दरम्यान धावणार आहे. ही विशेष गाडी मुदखेड, धर्माबाद, बासर, निजामाबाद, कामारेड्डी, मेडचल, चारलापल्ली, नलगोंडा, मिर्यालागुडा, नाडीकुडे, पिदुगुरल्ला, सत्तेनापल्ले, गुंटूर, विजयवाडा, गुडीवाडा, कैकलूर, अकिविदु, भीमावरम टाउन, तनुकु, राजमुंदरी, समालकोट, अन्नावरम, तुनी और एलमंचल्ली स्टेशनवर दोन्ही दिशांना थांबेल.

## डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त हदगाव येथील श्री दत्त कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात व्याख्यान

**नांदेड (प्रतिनिधी)–** डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त श्री आर. आर. लाहोटी विज्ञान महाविद्यालय मोर्शी जि. अमरावती आणि श्री दत्त कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय हदगाव जि. नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी व्याख्याते प्रा. डॉ. चत्रभुज कदम यांनी आपल्या व्याख्यानातून डॉ. पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख यांचे कृषी व शैक्षणिक क्षेत्रातील कार्य या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. यातून त्यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय जीवनावर प्रकाश टाकला.

यावेळी डॉ. आर. आर. लाहोटी महाविद्यालय मोर्शी येथील प्राचार्य यांनी सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री दत्त महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य यांना डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जीवन चरित्रावर आधारित एक ग्रंथ व पंजाबराव देशमुख यांचा फोटो देऊन सत्कार केला. तत्पूर्वी प्रथमत: डॉ. पंजाबराव देशमुख आणि कै. माजी आमदार बापूराव पाटील आष्टीकर यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून प्रमुख पाहुण्यांच्या



हस्ते पूजन करण्यात आले. त्यानंतर करिअर कट्टा विभागाचे प्रमुख प्रा. दवणे, प्रा. पावडे यांनी अध्यक्ष व प्रमुख पाहुण्याचे स्वागत केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. डी. एस. काकडे यांनी केला.

प्रा. एकनाथ पावडे यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन तर प्रा. दवणे यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांना दहावी, बारावीनंतरच्या करिअरच्या अनुषंगाने आवश्यक असलेल्या माहितीबाबत भविष्य निर्णय मार्गदर्शिका ग्रंथ ही पुस्तिका नि:शुल्क वितरित करण्यात आली.

## शिवधारा पतसंस्थेचा दीपस्तंभ पुरस्काराने गौरव

**नांदेड (प्रतिनिधी) –** सहकार क्षेत्रात भरीव कामगिरी करीत मोलाचे योगदान दिल्याबद्दल तसेच पारदर्शक व्यवस्थापनासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी फेडरेशच्या वतीने राज्यस्तरीय प्रशिक्षण व पुरस्कार सोहळ्यात शिवधारा महिला नागरी पतसंस्थेला दीपस्तंभ पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनच्या वतीने आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त आयोजित राज्यस्तरीय प्रशिक्षण व दीपस्तंभ पुरस्कार वितरण सोहळा डेनिसन्स रिसॉर्ट, गोकर्ण महाबळेश्वर येथे उत्साहात पार पडला. या पुरस्काराचे वितरण राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे, खासदार प्रभाकर कोरे, खासदार




अण्णासाहेब जोले, डॉ. संजय होसमठ व सुरेखा लवांडे यांच्या हस्ते शिवधारा पतसंस्थेच्या संचालिका रेवती रवींद्र रगटे, विजया रवींद्र बोरसे आणि शाखा प्रभारी व्यवस्थापक गजानन बंडे यांना प्रदान करण्यात आला.

शिवधारा महिला नागरी पतसंस्थेने एक शाखा व तालुक्याच्या कार्यक्षेत्रापासून आपला प्रवास सुरू केला असून तळगळातील सामान्य नागरिकांपर्यंत बँकिंगची सुलभ सेवा देण्याचे कार्य संस्था करीत आहे. नुकतेच संस्थेला जिल्ह्याच्या कार्यक्षेत्र मिळाले असून येणाऱ्या काळात जिथे बँकिंगची गरज असेल तिथे नवीन शाखा सुरू करण्याचा मानस अध्यक्षा राजश्री पाटील यांनी व्यक्त केला.संस्थेने पुढील काळात अधिक पारदर्शकतेने आणि ग्राहकाभिमुख सेवेद्वारे पतसंस्था क्षेत्रात नव्या उंची गाठण्याचा संकल्प व्यक्त केला आहे. संस्थेच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत राज्य पतसंस्था फेडरेशनच्या वतीने संस्थेला दीपस्तंभ पुरस्कार सन्मानित करण्यात आले. या यशाबद्दल संस्थापक नामदार हेमंत पाटील, अध्यक्ष राजश्री पाटील, उपाध्यक्ष कीर्ती तगडपल्लेवर, सचिव नीता कटकमवर, तज्ञ संचालक धनंजय तांबेकर, सर्व संचालक मंडळ, अधिकारी आनंद संगावार तसेच समस्त कर्मचारीवृंद, दैनिक व आवर्ती ठेव प्रतिनिधी आणि ग्राहकवर्ग यांचे अभिनंदन करण्यात आले.

## इंदिरा गांधी महाविद्यालयास बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदक



**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व शहीद भगतसिंग महाविद्यालय, किल्लारी जिल्हा लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर महाविद्यालय इंटर झोन बॉक्सिंग स्पर्धेत सिडको येथील इंदिरा गांधी महाविद्यालयाला सुवर्णपदक प्राप्त झाले आहे.

क्रीडा संकुल लातूर येथे नुकतीच आंतर महाविद्यालय बॉक्सिंग स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेमध्ये इंदिरा गांधी महाविद्यालयाचा बी.ए. प्रथम वर्षाचा खेळाडू नागेश किशनराव बोबले याने ५१ ते ५५ किलो वजन गटात प्रतिस्पर्धी खेळाडूस हरवून स्पर्धेचे सुवर्णपदक मिळविले आहे. खेळाडूस क्रीडा संचालक डॉ. बाबुराव घायाळ, क्रीडा शिक्षक डॉ. रमेश नांदेडकर, नागराज चावरे, डॉ. रंजना अडकिने व डॉ. अभिजीत खेडकर यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण, उपाध्यक्षा सौ. अमिता चव्हाण, सचिव डी. पी. सावंत, सहसचिव प्राचार्य रावसाहेब शेंदारकर, खजिनदार ॲड. उदयराव निंबाळकर, संस्थेचे कार्यकारणी सदस्य नरेंद्र चव्हाण व प्राचार्य डॉ. दुर्गेश रवंदे यांनी नागेशचे अभिनंदन केले आहे.

## वसंतराव कलंबरकर यांना राष्ट्रीय कृषीरत्न पुरस्कार



**नांदेड (प्रतिनिधी)–** महात्मा फुले शिक्षण परिषदे तर्फे दिला जाणारा राष्ट्रीय कृषीरत्न पुरस्कार वसंतराव कलंबरकर यांना जाहीर झाला आहे. दि. २८ ऑक्टोबर रोजी रत्नागिरी येथे आयोजित राज्यस्तरीय शिक्षण परिषदेत कलंबरकर यांना हा पुरस्कार दिला जाणार आहे.

वसंत कलंबरकर मोटार वाहन निरीक्षक म्हणून परिवहन विभागात पुणे येथे कार्यरत आहेत. रस्ते सुरक्षा अभियानात वाहन चालकातील व्यसनमूक्ती संदर्भात जागरुकता व अपघातमूक्त भारत, सेंद्रिय शेती आणि फॅमिली फार्मर व यौगिक आहार यासारखे असंख्य उपक्रम हाती घेत समाजोपयोगी कार्य पार पाडत आहेत. शिक्षण हे आत्मोध्दारासह समाज परिवर्तनाचे साधन आहे, या ब्रिदाला जागत जन्मगावी कलंबर खु. (ता. लोहा) येथे प्राथमिक शाळेच्या चार वर्ग खोल्या डिजिटल केल्या. सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून ऊस, हळद, केळी, फळपीक, भाजीपाला आधुनिक पद्धतीने यशस्वी प्रयोग करून विक्रमी उत्पादन घेतात.

## अवैध कत्तलीसाठी जाणारे गोवंश ताब्यात

**नांदेड (प्रतिनिधी)–** कत्तलीसाठी घेऊन जाणाऱ्या सात गोवंशांची इतवारा पोलिसांनी रविवारी सुटका केली. या प्रकरणी तिघांना अटक केली असून त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक रणजीत भोईटे आणि संजय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाने ही कारवाई केली.

रविवारी दि. १२ ऑक्टोबर रोजी लक्ष्मीनगर देगलुर नाका नांदेड व राम रहिमनगर देगलुर नाका नांदेड येथे आरोपी शेख आयुब शेख मस्तान (वय ३२ वर्षे व्यवसाय व्यापार रा. ईस्लामपुरा नांदेड) याच्या घरासमोर ही कारवाई करण्यात आली.

## सोयाबीनसाठी हमीभाव खरेदी केंद्र तात्काळ सुरू करा -प्रल्हाद इंगोले

**नांदेड (प्रतिनिधी) –** सध्या बाजारात सोयाबीनचे दर हे हमीभावापेक्षा हजार - दीड हजार रुपयांनी कमी आहेत. त्यामुळे राज्य सरकारने तात्काळ सोयाबीन खरेदीसाठी शासकीय हमीभाव केंद्र तात्काळ सुरू करावेत, अशी मागणी शिवसेना प्रणित शेतकरी सेनेचे प्रदेश सरचिटणीस शेतकरी नेते प्रल्हाद इंगोले यांनी शासनाकडे केली आहे.



यंदा मराठवाड्यात सर्वत्र अतिवृष्टी झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. सोयाबीन सारखे पिकाचे अतोनात नुकसान झाले. जास्त पावसामुळे उतारा कमी आला. आजघडीला बाजारामध्ये सोयाबीनचे दर हे हमीभावापेक्षा दीड हजार रुपयांनी कमी आहेत. त्यामुळे शेतकरी हवाली झाला आहे. शासनाची मिळालेली मदत ही अत्यंत तोकडी आहे. त्यामुळे हाताश झालेल्या शेतकऱ्यांना थोडाफार दिलासा मिळावा, यासाठी राज्य सरकारने तात्काळ सोयाबीन खरेदीसाठी शासकीय हमीभाव खरेदी केंद्र सुरू करावेत, अशी मागणी शिवसेना प्रणित शेतकरी सेनेचे प्रदेश सरचिटणीस तथा शेतकरी नेते प्रल्हाद इंगोले यांनी केली आहे.

## 'एमआयएम'च्यावतीने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** सप्टेंबर अखेर जिल्ह्यामध्ये अतिवृष्टी झाल्याने पूर परिस्थिती गंभीर झाली होती. या पुराचा फटका सर्वाधिक सखल व नदीकाठच्या वसाहतींना बसला. पूर परिस्थितीमध्ये शेकडो नागरिकांचे घर पाण्याखाली गेल्याने त्यांचा संसार उघड्यावर पडला. अशा अडचणीत सापडलेल्या पूरग्रस्तांना 'एमआयएम'चे प्रदेश कार्याध्यक्ष सय्यद मोईन यांनी पक्ष प्रमुखांच्या आदेशावरून जवळपास पाच हजार धान्याच्या किट स्वखर्चातून वाटप केल्या. यानंतर लगेच या पुरात अडकलेल्या लोकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्याने त्यांना मोफत वैद्यकीय सेवा मिळावी या हेतूने शहरात ११ ऑक्टोबरपासून ते १३ ऑक्टोबर पर्यंत तीन दिवस वेगवेगळ्या ठिकाणी मोफत आरोग्य शिबिर घेण्यात आले. या आरोग्य शिबिराला पहिल्याच दिवशी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी केल्यानंतर मोफत औषधी वाटप करण्यात आली.



नांदेड शहरामध्ये खडकपुरा, बिलालनगर, किल्ला परिसर, गौतमनगर, चुनाल नाला, सैलाबनगर, पंचशीलनगर, इस्लामपुरा, भावेश्वरनगर, हतई, करबला यासह अनेक नगरांमध्ये गोदावरी नदीचे पाणी शिरले होते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात नागरिक या पुराच्या पाण्यात अडकून पडले होते. प्रशासनाने त्यांना बाहेर काढून महापालिकेने दिलेल्या निवाऱ्यामध्ये दाखल केले. परंतु याच निराधार झालेल्या कुटुंबीयांना खासदार तथा 'एमआयएम'चे प्रमुख असदुद्दीन ओवेसी यांच्या आदेशावरून प्रदेश कार्याध्यक्ष सय्यद मोईन यांनी पुढाकार घेतला.

जिल्ह्यात सर्वप्रथम त्यांनी धान्यांच्या किट पूरग्रस्तांच्या स्वाधीन केल्या. यासाठी त्यांनी स्वतः आपल्या कार्यकर्त्यांसोबत सर्वे करून खऱ्या लाभार्थ्यांना याचा लाभ उपलब्ध करून दिला. आता या पूरग्रस्तांसाठी शहरात आरोग्य शिबिर सुरू करण्यात आली आहेत. शनिवारी दि. ११ ऑक्टोबर रोजी खडकपुरा येथे शिबिर घेऊन पूरग्रस्तांची तपासणी केली. रविवारी दि.१२ ऑक्टोबर रोजी देगलूर नाका भागातील फातेमा गर्ल हायस्कूल गाडेगाव रोड येथे आणि १३ ऑक्टोबर रोजी हतई करबला लिबर्टी फंक्शन हॉल येथे या शिबिर घेण्यात आले.

या शिबिरामध्ये गरजू रुग्णांना मोफत औषधी देण्यात आली. विशेष म्हणजे शहरातील तज्ञ डॉक्टरांची टीम त्यांनी यासाठी मदतीला घेतली आहे. यात हाडांचे, हृदयरोग, फिजिशियन, कान- नाक- घसा, मेंदू विकार, स्त्रीरोग आणि मेंदू विकार तज्ज्ञ डॉक्टरांकडून पूरग्रस्तांच्या आरोग्याची तपासणी करण्यात आली. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी 'एमआयएम'चे मिर्झा अमजद बेग, शेख मिनाज, सोनू यांच्यासह एमआयएमचे पदाधिकारी, कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

## कमांडिंग ऑफिसरच्या हस्ते एनसीसी वार्षिक प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन

**रामतीर्थ (प्रतिनिधी)–** शंकरनगर येथील नवोदय विद्यालयात राष्ट्रीय छात्र सेना (NCC) चे वार्षिक प्रशिक्षण शिबीर १० ऑक्टोबर रोजी उत्साहपूर्ण वातावरणात सुरू झाले. या शिबिराचे उद्घाटन ५२ महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल दिलीप रेड्डी यांच्या हस्ते करण्यात आले. सदर प्रशिक्षण शिबिर १९ ऑक्टोबर पर्यंत चालणार आहे.



उद्घाटन प्रसंगी अध्यक्षीय भाषणात कर्नल दिलीप रेड्डी यांनी विद्यार्थ्यांना अनुशासन, देशभक्ती आणि नेतृत्वगुण यांच्या महत्त्वाबद्दल मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, एनसीसी शिबिरामध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना शारीरिक व मानसिक तंदुरुस्ती साध्य करण्याची संधी मिळते. शिबिरे, परेड, आणि विविध प्रशिक्षण कार्यक्रमांमुळे त्यांच्यात टीमवर्क, आत्मसंयम व निर्णयक्षमता वाढते. तसेच, देशाच्या संरक्षण दलात सामील होऊ इच्छिणाऱ्यांसाठी एनसीसी हा एक मजबूत पाया ठरतो.

एनसीसी हे केवळ एक प्रशिक्षण नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे माध्यम आहे. जबाबदारीची जाणीव, आत्मविश्वास आणि देशसेवेची भावना प्रत्येक कॅडेटमध्ये रुजविणे हेच या शिबिराचे मुख्य उद्दिष्ट आहे.

शिबिरादरम्यान कॅडेटस्ना ड्रिल, शारीरिक तंदुरुस्ती, नकाशावाचन, समाजसेवा, आपत्ती व्यवस्थापन, तसेच शस्त्र प्रशिक्षण अशा विविध विषयांवर सैद्धांतिक व प्रात्यक्षिक मार्गदर्शन दिले जाणार आहे.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस शिबीर अधिकारी लेप्टनंट डॉ. मुकुंद कवडे यांनी स्वागतपर भाषण केले. तर प्रदर्शन सुभेदार मेजर यांनी आभार मानले. या उद्घाटन समारंभास एनसीसी अधिकारी लेप्टनंट डॉ. दत्तराम रगडे, भोसीकर, कुलकर्णी जेसीओ एनसीओ आणि ५२ महाराष्ट्र बटालियन नांदेड आणि छत्रपती संभाजी नगर येथील ५० बटालियन औरंगाबाद येथील ४० छात्र सैनिक वार्षिक शिबिरासाठी सहभागी आहेत. या शिबिरात ४१७ एनसीसी कॅडेटस् उपस्थित आहेत.

स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती

# शिवार



# ऑक्टोबर हिट; जनावरांना सांभाळा!

**अचानक वाढणाऱ्या उष्णतेमुळे जनावरांची अधिक काळजी घेणे क्रमप्राप्त ठरते. वाढत्या तापमानामुळे जनावरांचे व्यवस्थापन योग्यरितीने करण्यासाठी रितसर नियोजन करणे गरजेचे आहे. त्यासाठी हवामान बदलावर लक्ष ठेऊन दिवसाच्या उच्च तापमानापासून जनावरांना वाचविण्यासाठी चांगला निवारा व मुबलक पाणी यांचा पुरवठा करणे आवश्यक आहे.**

भारतीय उपखंडातील ऑक्टोबर महिन्यातील हवामानास 'ऑक्टोबर हिट' असे संबोधले जाते. ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्यांच्या दरम्यान सूर्य दक्षिणायनात असताना उत्तरेकडील कमी दाबाचा पट्टा कमकुवत होत जाऊन त्याची जागा हळूहळू उच्च दाबाने घेतली जाते. याच दरम्यान नैऋत्य मोसमी वारे कमकुवत होत जाऊन हळूहळू मागे हटतात. ऑक्टोबरच्या सुरुवातीस मान्सून उत्तरेकडील मैदानातून मागे हटतो. ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिना हा उष्ण पावसाळा आणि कोरडा हिवाळा यातील संक्रमण काळ असतो. मान्सून परतल्यानंतर आकाश निरभ्र होऊन तापमानात वाढ होते, या काळात दिवसाचे तापमान अधिक आणि रात्रीचे तापमान कमी व आल्हाददायक असते. तसेच जमीन अजूनही ओलसर असते व दिवसा हवामान त्रासदायक होत जाते, यालाच 'ऑक्टोबर हिट' असे म्हणतात. उष्ण हवामानात जनावरांचे व्यवस्थापन उच्च तापमानामुळे सर्व प्रकारच्या (उदा. गाय, म्हैस आदी.) जनावरांवर ताण येतो, त्यामुळे मिळणारे उत्पादन कमी होते.

## जनावरांची कोणती काळजी घ्याल...

- खाद्य : जनावरांना चारा शक्यतो सकाळी व सायंकाळीच द्यावा. हिरव्या चाऱ्यामध्ये मका, लसूण घास, कडवळ यांसारखा पोषक चारा द्यावा. त्यामुळे आरोग्य चांगले राहते. आहारात क्षार मिश्रणाचा वापर करावा, म्हणजे दूध उत्पादनात सातत्य टिकून राहते व प्रजनन क्षमताही सुधारते.
- पाणी : स्वच्छ व थंड पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध करून द्यावे. शरीराचे तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी पाण्याचा उपयोग होतो. पाण्याची भांडी आकाराने मोठी व अशा ठिकाणी ठेवलेली असावीत. ज्याठिकाणी सर्व जनावरांना सहजरीत्या पाणी पिता येईल. जर गायी व म्हशी मुक्तपणे संचार करत असतील तर (मुक्त गोठा) पाण्याची भांडी सावलीत ठेवावीत.
- गोठा : छोट्या, वयस्कर आणि आजारी जनावरांना सुयोग्य निवाऱ्याची अधिक गरज असते. जनावरांना सकाळी व सायंकाळी चरण्यासाठी न्यावे, दुपारची चराई टाळावी. या काळात जनावरांना सावलीत बांधावे. गोठ्याचे छप्पर गवत, पालापाचोळा यांनी झाकून त्यावर पाण्याचा फवारा मारावा. त्यामुळे छप्पर थंड राहून उन्हाची झळ कमी होते, शक्य झाल्यास गोठ्यात पंखे, फॉगर्स बसवून घ्यावेत. गोठ्यात सभोवताली हिरवी झाडे असल्यास गोठ्यातील वातावरण थंड राहण्यास मदत होते. नसल्यास दुपारच्या वेळी वारा वाहत असलेल्या दिशेने गोठ्याच्या बाजूस पाण्यात भिजवलेले बारदान किंवा गोणपाट बांधावे. यामुळे गोठ्यात थंड वारा येतो व वातावरण आल्हाददायक राहण्यास मदत होते.
- जनावरांची हाताळणी : संशोधनातून असे सिद्ध झाले आहे की, उष्ण वातावरणात जनावरांची जास्त हालचाल झाल्यास त्यांच्या शरीराचे तापमान साधारणपेक्षा ०.५ ते ३.५ अंश सेल्सिअसने वाढते.
- शरीराच्या वाढलेल्या तापमानामुळे जनावरांची उत्पादनक्षमता कमी होते (उदा. एच. एफ. व जर्सी गाय) तसेच त्यांच्या नियमित शरीरक्रियांवर परिणाम होतो. जनावरांची हालचाल करवयाची झाल्यास ती तापमान कमी असताना करावी जेणेकरून वाढत्या तापमानाचा त्यांच्यावर परिणाम होणार नाही (उदा. सकाळी एक तास लवकर व संध्याकाळी एक तास उशिरा दूध काढल्यास दुग्धोत्पादनात वाढ होऊ शकते).

## उष्णतेचा ताण कसा ओळखवा?

- जीभ बाहेर काढून तोंडाने श्वास घेणे.
- श्वसनाचा दर वाढणे.
- पाणी पिण्याचे प्रमाण वाढणे.
- भूक मंदावणे.
- उदासिनता.
- तोंडातून जास्त प्रमाणात लाळ गळणे.
- उष्णतेचा ताण सहन न झाल्यास बेशुद्ध होणे.
- उष्णतेच्या ताणाला बळी पडण्याचे प्रमाण विविध जातींमध्ये वेगवेगळे असते.
- जास्त दूध देणाऱ्या गायींवर उष्णतेचा परिणाम कमी दूध देणाऱ्या गायींपेक्षा तुलनेने जास्त होतो.
- भाकड गायींपेक्षा दूध देणाऱ्या गायींवर उष्णतेचा परिणाम जास्त होतो. कारण दूध देणाऱ्या गायींमध्ये चयापचय क्रियेदरम्यान अधिकची उष्णता शरीरात तयार होते.
- उष्णता सहन करण्याची क्षमता जर्सी गायींपेक्षा होल्स्टेन गायींमध्ये कमी असते.
- वजन जास्त असणाऱ्या गायी (४५० किलोपेक्षा जास्त) तुलनेने वजन कमी असलेल्या गायींपेक्षा उष्णतेला जास्त बळी पडतात.
- नुकत्याच लोकर काढलेल्या मेंढ्या उष्णतेला जास्त प्रमाणात बळी पडतात.



# तंत्र बागायती गहू लागवडीचे...

**बागायती गव्हाच्या पेरणीची योग्य वेळ नोव्हेंबरचा पहिला पंधरवडा आहे. या कालावधीत पेरणी केल्यास उत्पादन चांगले येते. वेळेवर पेरणीसाठी हेक्टरी १०० ते १२५ किलो बियाणे वापरावे. उशिरा पेरणीसाठी हेक्टरी १२५ ते १५० किलो बियाणे वापरावे. संरक्षित पाण्याखालील लागवडीसाठी ७५ ते १०० किलो बियाणे पेरणीसाठी वापरावे. बागायती गव्हासाठी पाण्याचा चांगला निचरा होणारी, भारी व खोल जमिनीची निवड करावी. तथापि, मध्यम जमिनीत भरखते व रासायनिक खतांचा वापर केल्यास उत्पादन चांगले घेता येईल. एक किंवा दोन पाणी उपलब्ध असल्यास लागवड जमिनीत ओलावा टिकवून धरणाऱ्या भारी जमिनीतच करावी. शक्यतो हलक्या जमिनीत गहू घेण्याचे टाळावे...**



पिकाच्या मुळ्या जमिनीत ६० ते ७५ सें. मी. खोलवर जातात. म्हणून या पिकासाठी चांगली भुसभुशीत जमिनीची निवड करावी. शेवटच्या कुळवणीच्या अगोदर १० ते १२ टन चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत पसरावे. संरक्षित पाण्याखालील पेरणी १ ते १० नोव्हेंबरमध्ये करावी. बागायती वेळेवर पेरणीची योग्य वेळ नोव्हेंबरचा पहिला पंधरवडा आहे. या कालावधीत पेरणी केल्यास उत्पादन चांगले येते. बागायती गव्हाची पेरणीसुद्धा उशिरा करता येते. परंतु वेळेवर पेरणी केलेल्या गव्हापेक्षा उत्पादन कमी येते. बागायती गव्हाची पेरणी १५ नोव्हेंबरनंतर उशिरा केल्यास प्रत्येक पंधरवड्यास हेक्टरी २.५ क्विंटल उत्पादन कमी येते. त्यामुळे १५ डिसेंबरनंतर पेरलेले गव्हाचे पीक फायदेशीर ठरत नाही. वेळेवर पेरणीसाठी हेक्टरी १०० ते १२५ किलो बियाणे वापरावे. उशिरा पेरणीसाठी हेक्टरी १२५ ते १५० किलो बियाणे वापरावे. संरक्षित पाण्याखालील लागवडीसाठी ७५ ते १०० किलो बियाणे पेरणीसाठी वापरावे. पेरणीपूर्वी बियाण्यास थायरम (७५ टक्के डब्ल्यूएस) ३ ग्रॅम प्रति किलो बियाणे या प्रमाणे बीजप्रक्रिया करावी. बुरशीनाशकाची बीजप्रक्रिया करून बियाणे वाळवल्यानंतर प्रति किलो बियाण्यास २५ ग्रॅम ॲझोटोबॅक्टर आणि २५ ग्रॅम स्फुरद विरघळविणाऱ्या जिवाणू संवर्धकाची बीजप्रक्रिया करावी. जिवाणू खतांच्या बीजप्रक्रियेमुळे उत्पादनात १० ते १५ टक्के वाढ होते. पेरणीच्या वेळी जमिनीत पुरेशी ओल असावी. योग्य ओल नसल्यास प्रथम जमीन ओलवावी. वापसा आल्यावर जमीन कुळवावी. बागायत गव्हाची वेळेवर पेरणी दोन ओळीत २० सें.मी. आणि उशिरा पेरणी १८ सें. मी. अंतर ठेवून करावी. पेरणी ५ ते ६ सें. मी. खोल करावी. त्यामुळे उगवण चांगली होते. संरक्षित पाण्याखालील पेरणी दोन ओळींत २० सें. मी. अंतर ठेवून करावी. पेरणी उभी-आडवी अशा दोन्ही बाजूंनी न करता ती एकेरी करावी म्हणजे आंतरमशागत करणे सोयीचे होते. बियाणे झाकण्यासाठी कुळव उलटा करून चालवावा. म्हणजे बी व्यवस्थित दबून झाकले जाते. जमिनीचा उतार लक्षात घेऊन गव्हासाठी २.५ ते ४ मीटर रूंद आणि ७ ते २५ मीटर लांब आकाराचे सारे पाडावेत.

## वेळेवर पेरणी

### सरबती जाती

- फुले समाधान, त्र्यंबक, तपोवन, एम.ए.सी.एस. ६२२२, एमएसीएस-६४७८.
- बागायती उशिरा पेरणीसाठी फुले समाधान, एकेएडब्ल्यू - ४६२७ जातीची शिफारस.
- पाण्याची उपलब्धता कमी प्रमाणात असल्यास एनआयएब्ल्यू - १४१५ (नेत्रावती) आणि एचडी २९८७ (पुसा बहर) जातींची निवड करावी.

### बन्सी जाती

- बागायती वेळेवर पेरणी एनआयडीडब्ल्यू - २९५ (गोदावरी) जातीची निवड करावी.
- उशिरा पेरणीसाठी एमएसीएस-४०२८, एमएसीएस-४०५८ जातींची निवड करावी.

### खपली गहू

- या गव्हाचा वापर रवा, खीर आणि नाश्त्याचे पदार्थ तयार करण्यासाठी केला जातो.
- तंतूंचे प्रमाण इतर गव्हाच्या तुलनेत जास्त असते (१६ टक्क्यांपेक्षा जास्त).
- या गव्हाच्या खाद्यपदार्थामध्ये ग्लायकॅमिक निर्देशांक कमी असतो, मधुमेही रुग्णांच्या आहारात समाविष्ट.
- जात : एमएसीएस- २९७१.

### नवीन प्रसारित जाती

फुले समाधान (एनआयएडब्ल्यू १९९४) : बागायती क्षेत्रात वेळेवर (१ ते १५ नोव्हेंबर) तसेच उशिरा (१५ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर) पेरणीसाठी योग्य. वेळेवर पेरणीसाठी उत्पादन ४६.१२ क्विंटल/हेक्टर. उशिरा पेरणीमध्ये उत्पादन ४४.२३ क्विंटल / हेक्टर. तांबेरा रोग तसेच मावा किडीस प्रतिकारक्षम. टपोरे व आकर्षक दाणे, प्रथिनांचे प्रमाण १२.५ ते १३.८ टक्के. चपातीची प्रत उत्कृष्ट व प्रचलित जातीपेक्षा सरस. प्रचलित जातीपेक्षा ९ ते १० दिवस लवकर येतो.

### फुले सात्त्विक (एन.आय.ए.डब्ल्यू.३१७०)

संरक्षित पाण्याखाली पेरणीसाठी प्रसारित. प्रथिनांचे प्रमाण ११ ते १२ टक्के, बिस्कीट स्प्रेड मानक १० पेक्षा जास्त. दाण्याचा कडकपणा खूप कमी म्हणजे (३० ते ४५ टक्के) तसेच ब्रेड गुणवत्ता स्कोअर ७.० ते ७.५०, ग्लूटेन इंडेक्स ८० ते ८५ टक्के. चपातीचा गुणवत्ता स्कोअर हा ७ ते ७.५. यामध्ये लोहाचे प्रमाण हे ३५ ते ४० पीपीएम, झिंक ३० ते ३५ पीपीएम. तांबेरा रोगास प्रतिकारक्षम. उत्पादनक्षमता ३५ ते ४० क्विंटल प्रति हेक्टरी.

### एनआयडीडब्ल्यू -११४

द्विपकल्पीय विभागातील जिरायती किंवा एका ओलिताखाली (एक पाणी पेरणीनंतर ४२ दिवसांनी) वेळेवर पेरणीसाठी शिफारशीत बन्सी जात. तांबेरा रोगास प्रतिकारक. शेवया, कुरड्या व पास्ता यासाठी उत्तम. तयार होण्याचा कालावधी ११० ते ११५ दिवस. उत्पादनक्षमता ३५ ते ४० क्विंटल प्रति हेक्टरी.



## खत व्यवस्थापन

- बागायती पिकासाठी हेक्टरी १० टन चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत द्यावे. बागायती गव्हाच्या वेळेवर पेरणीसाठी हेक्टरी १२० किलो नत्र, ६० किलो स्फुरद व ४० किलो पालाश द्यावे. निम्मे नत्र व संपूर्ण स्फुरद आणि पालाश पेरणीच्यावेळी व उरलेले निम्मे नत्र पेरणीनंतर ३ आठवड्यांनी खुरपणी झाल्यावर पहिल्या पाण्याच्या वेळी द्यावे.
- उशिरा केलेल्या पेरणीसाठी हे प्रमाण हेक्टरी ८० किलो नत्र, ४० किलो स्फुरद आणि ४० किलो पालाश इतके द्यावे. निम्मे नत्र व स्फुरद आणि पालाश पेरणीच्या वेळी व उरलेले निम्मे नत्र पेरणीनंतर ३ आठवड्यांनी द्यावे.
- पश्चिम महाराष्ट्रातील मैदानी खोल काळ्या जमिनीवर गव्हाच्या उत्पादनाकरिता पेरणीपूर्वी प्रति हेक्टरी १ टन शेणखत मिसळून पेरणी जोड ओळीत (१५ ते २० सें.मी.) करून प्रति हेक्टर ७० किलो नत्र, ३५ किलो स्फुरद किलो, युरिया-डीएपी ब्रिकेटमार्फत (२.७ ग्रॅ. वजनाची ब्रिकेट) १५ सें.मी. अंतराच्या जोड ओळीत प्रत्येकी ३० सें.मी. अंतरावर १० सें.मी. खोल खोचावी.
- पश्चिम महाराष्ट्राच्या मैदानी प्रदेशातील लोहाची कमतरता असणाऱ्या जमिनीमध्ये अधिक उत्पादन, आर्थिक फायदा व जमिनीतील लोहाची पातळी राखण्यासाठी पिकास शिफारशीत अन्नद्रव्यांसोबत (१२०:६०:४०) नत्र : स्फुरद : पालाश किलो प्रति हेक्टर अधिक १० टन शेणखत प्रती हेक्टरी, मुरविलेले हिराकस २० किलो प्रति हेक्टरी (१०० किलो शेणखतात १५ दिवस मुरवून) जमिनीतून द्यावे.
- बागायती क्षेत्रात अधिक उत्पादन मिळविण्यासाठी पिकास शिफारशीत अन्नद्रव्यांची मात्रा देऊन पेरणीनंतर ५५ ते ७० दिवसांनी २०० ग्रॅम १९:१९:१९ या विद्राव्य खताची किंवा डीएपी या खताची १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

# मर्यादित सिंचनात गहू लागवड

**रब्बी हंगामात घेतले जाणारे गहू हे महत्त्वाचे पीक आहे. गव्हाची लागवड जिरायत, मर्यादित सिंचन आणि बागायती अशा तीनही प्रकारे करता येते. मर्यादित सिंचनासाठी (१ ते २ पाणी) महात्मा फुले कृषी विद्यापीठाने अनेक वाण प्रसारित केलेले आहेत. त्या वाणांची निवड करून १ ते २ पाण्यात गहू पिकाचे चांगले उत्पादन मिळविता येते. ओलावा टिकवून धरणाऱ्या भारी जमिनीची गहू लागवडीसाठी निवड करावी. पेरणीच्या वेळी जमिनीत पुरेशी ओल असावी. पेरणी उथळ म्हणजे ५ ते ६ सें.मी. खोलीवर करावी. त्यामुळे उगवण चांगली होते.**



- जमीन : गहू पिकाच्या लागवडीसाठी भारी व खोल जमिनीची निवड करावी. एक किंवा दोन पाणी उपलब्ध असल्यास जमिनीत ओलावा टिकवून धरणाऱ्या भारी जमिनीतच गव्हाची लागवड करावी.
- पेरणीची वेळ : संरक्षित पाण्याखाली घेण्यात येणाऱ्या गव्हाची पेरणी २५ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर दरम्यान करावी.
- पूर्वमशागत : जमिनीची मशागत करताना खरीप पीक जर सोयाबीन किंवा गळीत धान्य असेल, तर एकच कुळवणी करावी. कुळवणीच्या अगोदर चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत शेतात पसरवून टाकावे. आधीच्या पिकाची धसकटे व इतर काडीकचरा वेचून त्याचा कंपोस्टसाठी वापर करावा.
- बियाणे प्रमाण : संरक्षित पाण्याखाली पेरणीसाठी हेक्टरी १०० किलो बियाणे वापरावे.
- बीजप्रक्रिया : पेरणीपूर्वी बियाण्यास थायरम (७५ डब्ल्यू.एस.) या बुरशीनाशकाची ३ ग्रॅम प्रति किलो बियाणे याप्रमाणे बीजप्रक्रिया करावी. त्यानंतर मावा, तुडतुडे आणि खोडमाशी या किडींच्या नियंत्रणासाठी थायोमेथोक्झाम (७० डब्ल्यूएस) १७.५ मिलि प्रति १० किलो बियाणे या प्रमाणात बीजप्रक्रिया करून बियाणे सावलीमध्ये सुकवावे. त्यानंतर प्रति किलो बियाण्यास ॲझोटोबॅक्टर व स्फुरद विरघळविणाऱ्या जिवाणू खतांची प्रत्येकी २५ ग्रॅम प्रमाणे बीजप्रक्रिया करावी. जिवाणू खतांच्या बीजप्रक्रियेमुळे उत्पादनात १० ते १५ टक्के वाढ मिळते.



- पेरणी : पेरणीच्या वेळी जमिनीत पुरेशी ओल असावी. पेरणी उथळ म्हणजे ५ ते ६ सें. मी. खोलीवर करावी. त्यामुळे उगवण चांगली होते. संरक्षित पाण्याखालील गव्हाची पेरणी दोन ओळींत २० सें.मी. अंतर ठेवून करावी. पेरणी उभी आडवी अशी दोन्ही बाजूंनी न करता ती एकेरी करावी. म्हणजे आंतरमशागतीची कामे करणे सोयीचे होते. बियाणे झाकण्यासाठी कुळव उलटा करून चालवावा. जमिनीचा उतार लक्षात घेऊन गव्हासाठी २.५ ते ४ मीटर रुंदीचे व ७ ते २५ मीटर लांब या आकाराचे सारे पाडावेत.
- सिंचन व्यवस्थापन : अपुऱ्या पाणीपुरवठा परिस्थितीत कमी पाण्यात अधिक उत्पादनक्षम वाणांचा वापर करून खालीलप्रमाणे पाणी व्यवस्थापन करावे. एकच पाणी देणे शक्य असल्यास पेरणीनंतर ४० ते ४२ दिवसांनी द्यावे. दोन पाणी देताना पहिले पाणी पेरणीनंतर २० ते २२ दिवसांनी आणि दुसरे पाणी ६० ते ६५ दिवसांनी द्यावे. तीन पाणी देताना पहिले पाणी पेरणीनंतर २० ते २२ दिवसांनी, दुसरे पाणी ४० ते ४२ दिवसांनी आणि तिसरे पाणी ६० ते ६५ दिवसांनी द्यावे.
- आंतरमशागत : पेरणीपासून ३० ते ४० दिवसांचे आत तणाचे प्रमाण लक्षात घेऊन एक किंवा दोन वेळा खुरपणी करावी. आवश्यकतेप्रमाणे १ ते २ कोळपण्या करून जमीन मोकळी करावी. त्यामुळे तणांचा नाश होतो. जमिनीत ओलावा टिकून राहण्यास मदत होते. जिरायती गव्हामध्ये जमिनीवर आच्छादनाचा वापर केल्यास बाष्पीभवन कमी होऊन जमिनीत ओलावा जास्त टिकून राहतो.

### जमिनीतील ओलावा टिकविण्यासाठी उपाययोजना

ठिबक किंवा तुषार सिंचन पद्धतीचा अवलंब करावा. तुषार पद्धतीने सिंचन केल्यास जास्तीचे क्षेत्र कमी कालावधीत भिजविता येईल. जमिनीत कमी ओलावा असल्यास, पोटॅशिअम नायट्रेट १ टक्का प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. या फवारणीमुळे पिकाच्या पानातील क्रिया गतिमान होण्यास मदत होते. पीक जमिनीतील उपलब्ध ओलावा शोषून घेण्यास सुरुवात करते. पिकास पेरणीनंतर ५५ आणि ७० दिवसांनी १९:१९:१९ या विद्राव्य खताची २०० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

# 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' स्पर्धात्मक अभियान राबविण्याची कार्यवाही सुरू

**मुंबई (प्रतिनिधी)** –'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' या स्पर्धात्मक अभियानास दोन वर्षात मोठा प्रतिसाद लाभला आहे. २०२५–२६ मध्ये हे अभियान राबविण्यासाठी ८६.७३ कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली असून सुधारित निकष आणि नवीन उपक्रमांसह या अभियानाचा तिसरा टप्पा राबविण्याच्या अनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही सुरू असल्याची माहिती शालेय शिक्षण विभागामार्फत देण्यात आली.

२०२५–२६ या वर्षाकरीता 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' अभियान राबविताना या अभियानाच्या निकषांमध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. यावर्षीही अभियानासाठी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे. २०२५–२६ या वर्षामध्ये सदर अभियान सुधारित निकषांसह राबविण्याच्या अनुषंगाने सर्व संचालकांशी समन्वय साधून सविस्तर प्रस्ताव सादर करण्याबाबत आयुक्त (शिक्षण) यांना कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने २०२५–२६ या वर्षाकरीता 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' टप्पा–३ अभियान राबविण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त (शिक्षण) यांच्यामार्फत २९ ऑगस्ट २०२५ रोजी शासनास प्राप्त झाला आहे. या प्रस्तावावर शासन स्तरावर कार्यवाही सुरू असून हे अभियान नवीन उपक्रमांसह राज्यभरात राबविण्यात येणार आहे.

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या ३० नोव्हेंबर २०२३ च्या शासन निर्णयान्वये २०२३–२४ मध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' हे स्पर्धात्मक अभियान राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांकरीता १ जानेवारी २०२४ ते १५ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत राबविण्यात आले. या अभियानास विद्यार्थी व शिक्षकांबरोबरच माजी विद्यार्थी, पालक व शिक्षणप्रेमी नागरिकांनी भरभरून प्रतिसाद दिला. ९५ टक्के शाळांमधील सुमारे दोन कोटी विद्यार्थी या अभियानांतर्गत विविध उपक्रमात सहभागी झाले होते. या अभियानातील काही उपक्रमांची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये देखील झाली आहे.

२०२४–२५ मध्ये देखील 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' टप्पा–२ हे स्पर्धात्मक अभियान काही नवनवीन उपक्रमांसह २६ जुलै २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये २९ जुलै २०२४ ते १५ सप्टेंबर २०२४ या कालावधीत राबविण्यात आले. १८ नोव्हेंबर २०२४ व ९ जानेवारी २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये पारितोषिकाची ७३.८२ कोटींची रक्कम वितरीत करण्यात आली आहे. सदर अभियानास २०२३–२४ प्रमाणेच मोठा प्रतिसाद मिळाला.

आता २०२५–२६ या वर्षाकरिता 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' हे स्पर्धात्मक अभियान राबविण्याच्या अनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही सुरू असून सदर अभियान नवीन उपक्रमांसह राज्यभरात राबविण्यात येणार असल्याचे शालेय शिक्षण विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

# पदभरतीसाठी दिव्यांगांचे वैश्विक ओळखपत्र अनिवार्य

**मुंबई (प्रतिनिधी)**–दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार, राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय तसेच इतर सर्व संस्थांमधील विविध पदभरतीसाठी दिव्यांग उमेदवारांसाठी वैश्विक आ–ळखपत्र अनिवार्य करण्यात आले आहे, याबाबतचा शासन निर्णय दिव्यांग कल्याण विभागाने निर्गमित केला आहे.

विविध शासकीय, निमशासकीय व इतर सर्व प्राधिकरणे, संस्था इत्यादीमध्ये पदभरतीसाठी अर्ज घेताना दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित असलेल्या जागांसाठी संबंधित दिव्यांग व्यक्तींच्या वैश्विक ओळखपत्राचा क्रमांक नोंदविणे तसेच प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे. सर्व मंत्रालयीन विभाग तसेच त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व आस्थापना, विभाग प्रमुख, कार्यालय प्रमुख तसेच स्वायत्त संस्था यांना त्यांच्या आस्थापनेवर दिव्यांग आरक्षणांतर्गत सेवेत असलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जे दिव्यांग अधिकारी, कर्मचारी दिव्यांग आरक्षणांतर्गत नियुक्ती, पदोन्नती व अन्य शासकीय योजनांचा आणि सवलतींचा लाभ घेत आहेत,

## कागदपत्र हरवले

डॉ. बाबासाहेब आंबेडकर लोकशिक्षण प्रसारक मंडळ नांदेड या संस्थेचे मूळ कागदपत्र राज कॉर्नर ते दीपक नगर तरोडा बु. दरम्यान ऑटो प्रवासात हरवले आहे. त्यामध्ये नंबर १ सार्वजनिक न्यास नोंदणी प्रमाणपत्र अधिनियम १९५०(दुय्यम प्रत), २. रजिस्ट्रेशन सर्टीफिकेट, नंबर एनएनडी–११–६६, ३ अल्पसंख्याक दर्जा प्राप्त शासन मान्यतेचे प्रमाणपत्र क्रमांक अ. शै. स. २०१० प्र. क्र. १००/२०१० कार्यासन ५ तरी कोणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा. संपर्क पत्ता–अध्यक्ष–डॉ. बाबासाहेब आंबेडकर लोकशिक्षण प्रसारक मंडळ नांदेड मो. ९८५०४५७८४१.

## Change In Name

My old name is Najmuddin sardaruddin which now I am changing as New Name NAJMUDDIN SARDARODDIN QUAZI. Hence forth my all correspondence.will be done as per my New name.please consider the same.

Adress - At post.Khasab pura Kinwat Tq.Kinwat Dist.Nanded 431804

Mob.8407998337

## जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार शेख साजीद शेख रहेमान वय ४२ वर्षे, रा. फत्तेबुरूज, बर्की चौक इतवारा नांदेड ता. जि. नांदेड मो. न. ७८८७९३४१३३ यांनी या कार्यालयात त्यांचे स्वतःचे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरिता मागणी केली आहे. जन्म झालेल्याचे नाव शेख साजीद शेख रहेमान वय ४२ वर्षे, रा. फत्तेबुरूज, बर्की चौक इतवारा नांदेड ता. जि. नांदेड सदर व्यक्तीचा फत्तेबुरुज बर्कीचौक इतवारा नांदेड या ठिकाणी दिनांक ११/७/१९८३ या दिवशी जन्म झाला असून, जन्म प्रमाणपत्र मिळणेकरिता आदेश होणेसाठी सदर कार्यालयात दिनांक २३/९/२०२५ रोजी तहसील कार्यालय नांदेड येथे अर्ज सादर केला आहे. तरी वरील जन्म दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय नांदेड येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

तहसीलदार,
नांदेड करिता

## Change In Name

My (old name) is SAMINA KAOSAR MOHD TAHER which now I am, changing as (new name) SAMINA BANU MOHAMMED AMEEN DHILA Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.Address- SAMINA BANU MOHAMMED AMEEN DHILA H. No. 9-6-79 Room No. 28, POCHI COLONY MOHAMMADIYA COLONY NEAR DEGLOOR NAKA NANDED-431604 Mo. No. 9922578466

# उद्योग क्षेत्रात महाराष्ट्र कायम 'एक नंबर' ठेवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न –डॉ. सामंत

**मुंबई (प्रतिनिधी)**–महाराष्ट्राला उद्योग क्षेत्रात कायम स्वरूपी 'एक नंबर' वर ठेवण्यासाठी जे काही करावे लागेल, ती सर्व ताकद उद्योजकांना देण्याची राज्य शासनाकडून तयारी आहे, अशी ग्वाही उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली.

२०२२ – २३ आणि २०२३– २४ या वर्षांकरिता महाराष्ट्र राज्य निर्यात पुरस्कार २०२५ चे वितरण मराठी भाषा व उद्योग मंत्री डॉ.उदय सामंत यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. या पुरस्कार वितरण समारंभात उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नवीनकुमार सोना, उद्योग सचिव डॉ. पी अन्बळगन, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव एम. देवेंदर सिंह, उद्योग विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह, अतिरिक्त विकास आयुक्त वैभव वाघमारे तसेच पुरस्कार विजेते निर्यातदार उद्योजक उपस्थित होते.

उद्योग मंत्री डॉ.उदय सामंत म्हणाले की, राज्याच्या निर्यातीचे गुणोत्तर दहा पटीने वाढवण्यासाठी १२ नवीन धोरणे आणली जात आहेत. यात एव्हीजीसी, जीसीसी, बांबू, लेदर, एरोस्पेस, इलेक्ट्रॉनिक्स यासारखी धोरणे लवकरच येणार आहेत. या धोरणांमुळे उद्योजकांना दिलासा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दावोस, जर्मनी, जपान यासारख्या परदेश दौऱ्यांतील कराराद्वारे महाराष्ट्रात विक्रमी गुंतवणूक वाढल्याचे सांगत उद्योग मंत्री डॉ. सामंत म्हणाले की, दावोस येथे पहिल्या वर्षी १.७० लाख कोटी, दुसऱ्या वर्षी ७ लाख कोटी तर तिसऱ्या वर्षी १६ लाख कोटी रुपयाचे विक्रमी सामंजस्य करार झाले. या सामंजस्य कराराच्या ८० टक्के अंमलबजावणीसह महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असल्याचा अभिमान त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# तीन मित्रांचा भीषण अपघात, दोघे जागीच ठार

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)**– भरधाव हायवा ट्रकने समोरून येणाऱ्या पिकपला धडक दिल्याने भीषण अपघात झाला. अपघात एवढा भीषण होता की यामध्ये पिकपचा अक्षरशः चुराडा झाला. यामध्ये दोन तरुण जागीच ठार झाले आहेत. अपघात सिल्लोड भोकरदन रस्त्यावरील पिंपरी फाट्यावर घडला. या घटनेमुळे दोन कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी १ लाखांची मदत करण्याची उद्धव ठाकरेंची सरकारकडे मागणी

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** –अतिवृष्टीमुळे खरडून गेलेल्या जमिनीसाठी शेतकऱ्यांना मनरेगामधून साडेतीन लाख रुपयांची मदत करण्याची घोषणा राज्य सरकारने केली आहे. त्यापैकी दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात एक लाख रुपये जमा करावेत', अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी सरकारकडे केली.

अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी जाहीर करण्यात आलेले मदतीचे पॅकेज फसवे आहे, असा आरोपही त्यांनी केला. हे आत्तापर्यंतच्या इतिहासातील सर्वांत मोठे पॅकेज नाही तर आत्तापर्यंतच्या इतिहासातील सरकारने मारलेली ही सर्वांत मोठी थाप आहे, असे ते म्हणाले.

या वेळी झालेल्या जाहीर सभेत ते बोलत होते. पक्षाचे नेते आदित्य ठाकरे, खासदार संजय राऊत, ओमराजे निंबाळकर, अरविंद सावंत, आमदार अनिल परब, मिलिंद नार्वेकर, कैलास पाटील, संपर्कप्रमुख विनोद घोसाळकर, माजी खासदार चंद्रकांत खैरे, माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे आदी नेते यावेळी उपस्थित होते.

दुपारी क्रांती चौकातून मोर्चाला सुरुवात झाली. मराठवाड्याच्या विविध जिल्ह्यांतून आलेले शेतकरी मोर्चात सहभागी झाले होते. उद्धव ठाकरे हेही स्वत: पूर्ण मोर्चाभर यात सहभागी झाले होते. हा मोर्चा गुलमंडीवर पोहोचल्यावर त्या ठिकाणी जाहीर सभा घेण्यात आली. उद्धव ठाकरे यांनी या सभेला संबोधित केले.

## Change In Name

My old name is RESHMA PARVEEN which now I am changing as New Name RESHMA PARVEEN MOHAMMED NASEEMUDDIN Hence forth my all correspondence.will be done as per my New name.please consider the same.

Adress - H. No.1-10-192 JANGAMWADI ROAD. SHRI NAGAR, NANDED

Mob.8149970940

कार्यालय नगरपरिषद उमरी जि.नांदेड जावक क्र १३/९/२०२५ दिनांक १३/१०/२०२५

## उमरी नगरपरिषद जि.नांदेड
## जाहीर सुचना (सुधारित)

याद्वारे उमरी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक–२०२५ प्रभाग क्र. १ ते १० करीता मा. सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेश क. रानिआ/नप–२०२५/प्र.क्र. ०९/का–६ दिनांक ३०.०९.२०२५ अन्वये ८९ नायगांव विधानसभा मतदार संघातील उमरी शहर भागातील दिनांक १ जुलै २०२५ रोजी अस्तित्वात असलेली विधानसभा मतदार संघाची यादी घेवून ती प्रभाग क्रमांक १ ते १० प्रमाणे विभागून प्रारूप मतदार यादी तयार करण्यात आली आहे. मा.राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे पत्र क्र.रानिआ/नप– २०२५/प्र.क्र.०९/का–६ दि. १३/१०/२०२५ अन्वये प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचनपा दाखल करण्याच्या कालावधीस दि. १७/१०/२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तरी या मतदार यादी बाबत नागरीकांनी आपले हरकती व सूचना दिनांक ०८.१०.२०२५ ते १७.१०.२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत उमरी नगरपरिषद कार्यालयात लेखी सादर करावयात. मुदतीनंतर आलेल्या हरकती/ सुचनांचा विचार करण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी.

दिनांक :- १३/१०/२०२५
ठिकाण :- उमरी

(गणेश चाटे)
मुख्याधिकारी नगरपरिषद उमरी जि. नांदेड

जा.व.क्र ३२३४ दि.१३/१०/२५

## नगर परिषद देगलूर
## जाहीर प्रगटन

(नाव परिवर्तन / नविन नोंद करणेसंबधी.)

या जाहीर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, विनया भ्र. विलासराव देशपांडे देगावकर रा. देगलूर यांनी या कार्यालयात अर्ज सादर करुन स.न.-- गट - प्लॉट नं. - मालमत्ता अनु.क्र ६०४४८/२ पैकी पश्चिमेकडील अर्धा भाग विलास माधवराव देशपांडे यांच्या नावाने असलेली जायदाद खरेदीखत आधारे/कोर्ट डिक्री आधारे / ले आऊट आधारे त्याचे नावे परिवर्तन करुन घेऊ इच्छितात.चर्तुसिमा :पूर्व: विनया भ्र. विलासराव देशपांडे देगावकरचे दीर व पुतण्या यांच्यातील सामाईक मोकळी जागा व नंतर दोन टीनशेडच्या खोल्या. पश्चिमेस–विनया भ्र. विलासराव देशपांडे देगावकरचे दीर व पुतण्या यांच्यातील सामाईक मोकळी जागा नंतर कंपाऊंडवॉल व त्यानंतर विनया भ्र. विलासराव देशपांडे देगावकर यांचे दोन दुकान, दक्षिणेस आनंदराव माधवराव देगावकर यांचे राहते घर, उत्तरेस– सामाईक मोकळी जागा त्यानंतर यांगेश कल्याणकराव देशपांडे यांचे नारायणी व्यापारी संकुल तरी त्यांचे नाव कर आकारणी नोंद वहीत घेण्यात येत आहे त्यासंबधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी (७) दिवसाच्या आत लेखी अर्ज सादर करावा. नसता मुदतीनंतर अर्जदाराचे नावाची नोंद घेण्यात येईल.

**मुख्याधिकारी**
**देगलूर नगरपरिषद देगलूर**

## चौकशीची जाहीर नोटीस

एसआरएन क्रमांक–NND/28831/1860/24
फेरफार अहवाल अर्ज क्र. ....
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक मुक्ताई बहुउद्देशीय सेवाभावी संस्था चिखली ता. कंधार, जि. नांदेड
न्यासाचा पत्ता–हाऊस नंबर ७८२ चिखली, ता. कंधार, जि. नांदेड
अर्जदार–प्रणव बळीराम पुयड

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, नांदेड हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत.

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

| अनुक्रमांक | तपशील | अंदाजे मूल्ये |
|---|---|---|
| 1. | LIFE TIME MEMBERSHIP | 1057.00 |
| 2. | NSC | 1000 |

अ) जंगम मिळकत रोख रुपये –२०५७ मात्र
अक्षरी दोन हजार सत्तावन्न मात्र, फक्त.

स्थावर मिळकत वर्णन :

| अ. क्र. | शहर किंवा गाव | सी.एस. किंवा महानगरपालिका किंवा सर्व्हेक्षण क्रमांक | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/ कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | -- | | | |

ब. स्थावर मिळकत– रोख रुपये मात्र अक्षरी रुपये मात्र

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाच्या शिक्यानिशी आज दिनांक ६–१०–२०२५ रोजी दिली.

अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
नांदेड विभाग, नांदेड

जा.व.क्र ३२३२दि.१३/१०/२५

## नगर परिषद देगलूर
## जाहीर प्रगटन

(नाव परिवर्तन/नवीन नोंद करणेसंबधी.)

या जाहीर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सूर्यकांत एकनाथराव पडलवार सर्व्हे --गट नं. -५६५, प्लॉट क्र. -१५ व १६ मालमत्ता क्र. १६५०८/२ पुनम प्रवीण चंदावार यांच्या नावाने असलेली जायदाद खरेदीखत आधारे/कोर्ट डिक्री आधारे/ ले आऊट आधारे त्याचे नावे परिवर्तन करुन घेऊ इच्छितात.चर्तुसिमा : पूर्व: ९ मीटरचा रोड, पश्चिम प्लॉट नं. १२ व १३, दक्षिण : प्लॉट नं. १५ व १६ पैकी प्लॉट नं. ३, उत्तर : प्लॉट क्र. १५ व १६ पैकी प्लॉट नं. १. तरी त्यांचे नाव कर आकारणी नोंद वहीत घेण्यात येत आहे त्यासंबधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी (७) दिवसाच्या आत लेखी अर्ज सादर करावा. नसता मुदतीनंतर अर्जदाराचे नावाची नोंद घेण्यात येईल.

**मुख्याधिकारी**
**देगलूर नगरपरिषद देगलूर**

जा.व.क्र ३२३० दि.१३/१०/२५

## नगर परिषद देगलूर
## जाहीर प्रगटन

(नाव परिवर्तन/नवीन नोंद करणेसंबधी.)

या जाहीर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, संजय रघुनाथराव हिमगिरे सर्व्हे नं. -, गट नं. ५६५, प्लॉट क्र. -१५ व १६ मालमत्ता क्र. १६५०८/१ पुनम प्रवीण चंदावार यांच्या नावाने असलेली जायदाद खरेदीखत आधारे/कोर्ट डिक्री आधारे/ ले आऊट आधारे त्याचे नावे परिवर्तन करुन घेऊ इच्छितात.चर्तुसिमा :पूर्व: ९ मीटरचा रोड, पश्चिमेस: प्लॉट नं. १२, दक्षिण - प्लॉट नं. १५ व १६ पैकी प्लॉट नं. २, उत्तर : गट नं. ५६५ पैकी जमीन. तरी त्यांचे नाव कर आकारणी नोंद वहीत घेण्यात येत आहे त्यासंबधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी (७) दिवसाच्या आत लेखी अर्ज सादर करावा. नसता मुदतीनंतर अर्जदाराचे नावाची नोंद घेण्यात येईल.

**मुख्याधिकारी**
**देगलूर नगरपरिषद देगलूर**

जा.व.क्र ३२२८ दि.१३/१०/२५

## नगर परिषद देगलूर
## जाहीर प्रगटन

(नाव परिवर्तन/नवीन नोंद करणेसंबधी.)

या जाहीर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, विनीत पि. विठ्ठलराव ईश्वरे सर्व्हे रा. देगलूर, नं. -२१५, गट नं. ६११, प्लॉट क्र. -१२ मालमत्ता क्र. १३७४१ विठ्ठलराव मारोती ईश्वरे यांच्या नावाने असलेली जायदाद खरेदीखत आधारे/कोर्ट डिक्री आधारे/ ले आऊट आधारे त्याचे नावे परिवर्तन करुन घेऊ इच्छितात.चर्तुसिमा :पूर्व: सरकारी रस्ता रामपूर रोड, पश्चिम विश्रांतीबाई ईश्वरे यांचे प्लॉट नं.११, दक्षिण : लक्ष्मण गायकवाड यांचा प्लॉट नं.१३, उत्तर : गल्ली रस्ता. तरी त्यांचे नाव कर आकारणी नोंद वहीत घेण्यात येत आहे त्यासंबधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी (७) दिवसाच्या आत लेखी अर्ज सादर करावा. नसता मुदतीनंतर अर्जदाराचे नावाची नोंद घेण्यात येईल.

**मुख्याधिकारी**
**देगलूर नगरपरिषद देगलूर**

जा.व.क्र ३२३७ दि.१३/१०/२५

## नगर परिषद देगलूर
## जाहीर प्रगटन

(नाव परिवर्तन / नविन नोंद करणेसंबधी.)

या जाहीर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, चंद्रकलाबाई व्यंकटराव थडके सर्व्हे नं. -३२०, गट नं. ८७९, प्लॉट क्र. --मालमत्ता क्र. १३३२५ अरुणा अनिल झरे रा. देगलूर यांच्या नावाने असलेली जायदाद खरेदीखत आधारे/कोर्ट डिक्री आधारे / ले आऊट आधारे त्याचे नावे परिवर्तन करुन घेऊ इच्छितात.चर्तुसिमा : पूर्व: गट नं. ८७९ पैकी जमीन, पश्चिम रोड, क्षिण :नामदेव चांदोबा राजूरकर यांची गट नं. ८७९ पैकी जमीन, उत्तर : १.५० चा रोड. तरी त्यांचे नाव कर आकारणी नोंद वहीत घेण्यात येत आहे त्यासंबधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी (७) दिवसाच्या आत लेखी अर्ज सादर करावा. नसता मुदतीनंतर अर्जदाराचे नावाची नोंद घेण्यात येईल.

**मुख्याधिकारी**
**देगलूर नगरपरिषद देगलूर**

जा.व.क्र ३२३५ दि.१३/१०/२५

## नगर परिषद देगलूर
## जाहीर प्रगटन

(नाव परिवर्तन / नविन नोंद करणेसंबधी.)

या जाहीर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, १. काशीनाथ विठ्ठलराव बाबळे, २. पंढरीनाथ विठ्ठलराव बाबळे, ३. धोंडिबा विठ्ठलराव बाबळे रा. देगलूर यांनी या कार्यालयात अर्ज सादर करुन स.न.-- गट - प्लॉट नं. - मालमत्ता अनु.क्र १६०४४ पैकी पश्चिमेकडील अर्धा भाग विठ्ठल धोंडिबा बाबळे यांच्या नावाने असलेली जायदाद खरेदीखत आधारे/कोर्ट डिक्री आधारे / ले आऊट आधारे त्याचे नावे परिवर्तन करुन घेऊ इच्छितात.चर्तुसिमा :पूर्व: बागवान यांचे घर व अटपलवार यांचे घर, पश्चिम शंकरराव बद्रीवार यांचा प्लॉट, दक्षिण :पोतदार यांचे घर, उत्तर : रोड. तरी त्यांचे नाव कर आकारणी नोंद वहीत घेण्यात येत आहे त्यासंबधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी (७) दिवसाच्या आत लेखी अर्ज सादर करावा. नसता मुदतीनंतर अर्जदाराचे नावाची नोंद घेण्यात येईल.

**मुख्याधिकारी**
**देगलूर नगरपरिषद देगलूर**

जा.व.क्र ३२३१ दि.१३/१०/२५

## नगर परिषद देगलूर
## जाहीर प्रगटन

(नाव परिवर्तन / नविन नोंद करणेसंबधी.)

या जाहीर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, संगीता संतोष कुडते रा. देगलूर यांनी या कार्यालयात अर्ज सादर करुन स.न.-- गट - ९१८ प्लॉट नं. - १ मालमत्ता अनु.क्र १६९६८ पैकी पश्चिमेकडील अर्धा भाग मोहम्मद महेमूद मोहम्मद असलम यांच्या नावाने असलेली जायदाद खरेदीखत आधारे/कोर्ट डिक्री आधारे / ले आऊट आधारे त्याचे नावे परिवर्तन करुन घेऊ इच्छितात.चर्तुसिमा :पूर्व: ९ मीटरचा रोड, पश्चिम गट नं. ९१९ ची जमीन, दक्षिण :गट नं. ९२० ची जमीन, उत्तर : प्लॉट नंबर २. तरी त्यांचे नाव कर आकारणी नोंद वहीत घेण्यात येत आहे त्यासंबधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी (७) दिवसाच्या आत लेखी अर्ज सादर करावा. नसता मुदतीनंतर अर्जदाराचे नावाची नोंद घेण्यात येईल.

**मुख्याधिकारी**
**देगलूर नगरपरिषद देगलूर**

जा.व.क्र ३२३५ दि.१३/१०/२५

## नगर परिषद देगलूर
## जाहीर प्रगटन

(नाव परिवर्तन / नविन नोंद करणेसंबधी.)

या जाहीर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, बजरंग हणमंतराव चिंचोले रा. देगलूर यांनी या कार्यालयात अर्ज सादर करुन स.न.-- गट - ९२० प्लॉट नं. - १६ मालमत्ता अनु.क्र १६८०४ पैकी पश्चिमेकडील अर्धा भाग इफ्तेखार अहेमद शेख अमीन यांच्या नावाने असलेली जायदाद खरेदीखत आधारे/कोर्ट डिक्री आधारे / ले आऊट आधारे त्याचे नावे परिवर्तन करुन घेऊ इच्छितात. चर्तुसिमा :पूर्व: ९ मीटरचा रोड, पश्चिम प्लॉट नं. ११ व १२, दक्षिण : प्लॉट नं. १५, उत्तर : प्लॉट नंबर १७. तरी त्यांचे नाव कर आकारणी नोंद वहीत घेण्यात येत आहे त्यासंबधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी (७) दिवसाच्या आत लेखी अर्ज सादर करावा. नसता मुदतीनंतर अर्जदाराचे नावाची नोंद घेण्यात येईल.

**मुख्याधिकारी**
**देगलूर नगरपरिषद देगलूर**

जा.व.क्र ३२३८ दि.१३/१०/२५

## नगर परिषद देगलूर
## जाहीर प्रगटन

(नाव परिवर्तन / नविन नोंद करणेसंबधी.)

या जाहीर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, रुक्मीनबाई बळीराम वाडीकर रा. देगलूर यांनी या कार्यालयात अर्ज सादर करुन स.न.-- गट - १३५ प्लॉट नं. - ३४ मालमत्ता अनु.क्र १०३२२ पैकी पश्चिमेकडील अर्धा भाग प्रभाकर गोविंदराव नोमूलवार यांच्या नावाने असलेली जायदाद खरेदीखत आधारे/कोर्ट डिक्री आधारे / ले आऊट आधारे त्याचे नावे परिवर्तन करुन घेऊ इच्छितात. चर्तुसिमा :पूर्व: प्लॉट नं. ३९, पश्चिम रोड, दक्षिण : रोड, उत्तर : प्लॉट नंबर ३५.

तरी त्यांचे नाव कर आकारणी नोंद वहीत घेण्यात येत आहे त्यासंबधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी (७) दिवसाच्या आत लेखी अर्ज सादर करावा. नसता मुदतीनंतर अर्जदाराचे नावाची नोंद घेण्यात येईल.

**मुख्याधिकारी**
**देगलूर नगरपरिषद देगलूर**


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

**रामबाण ईलाज**
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
**सेवा क्लिनीक**
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

**गोदातीर समाचार**

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# नांदेड जिल्ह्यातील मोबाईल मिसिंगमधील २० लाख रुपयांचे १५० मोबाईल हस्तगत

## सायबर शाखेची कामगिरी

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यातील गहाळ झालेल्या मोबाईलचा शोध घेत वेगवेगळ्या ठिकाणांहून एकूण १५० मोबाईल (किंमत २० लाख १० हजार रुपये) हस्तगत करण्यात आले, त्या सर्व मोबाईलचे सोमवारी दि. १३ ऑक्टोबर रोजी एकत्रितरित्या पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

जिल्ह्यातील सार्वजनिक ठिकाण व वेगवेगळ्या आठवडी बाजारातून महागडे मोबाईल गहाळ झालेल्या मोबाईलचा शोध घेण्याच्या सूचना जिल्ह्यातील सर्व ठाणेदारांना पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी दिल्या होत्या.

तसेच सायबर पोलीस ठाण्याचे निरीक्षक वसंत सप्रे आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांना मिसिंग मोबाईल प्रकरणातील मोबाईल जप्तची आपल्या स्तरावरून कारवाई करण्याचे आदेशित केले.

शोध घेतलेल्या मोबाईलचे IMEI क्रमांकांची माहिती नांदेड पोलीस दलाचे Nanded Police या Facebook Page व Twitter वर टाकण्यात आली आहे. सदरची कामगिरी अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, डॉ. अर्चना पाटील, पोलीस उपअधीक्षक (गृह) डॉ. आश्विनी जगताप, सायबरचे फौजदार मारोती चव्हाण, हवालदार राजेंद्र सिटीकर, दीपक ओढणे, महेश बडगु, कांचन कसबे, रेश्मा पठाण, शुभांगी जाधव, दावीद पिडगे, काशीनाथ कारखेडे, व्यंकटेश सांगळे, ज्ञानेश्वर यन्नावार, दिपक राठोड, साई शेंडगे यांनी पाडली आहे. ज्यांचे मोबाईल गहाळ झाले त्यांनी CEIR पोर्टलवर मोबाईलची माहिती अपलोड करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.




**नांदेड** – शहरातील वजिराबाद गोवर्धन घाट शांतिधाम भूमीच्या पुलाच्या भिंतीमध्ये महाकाय असा वटवृक्ष फुलला आहे. या वटवृक्षामुळे पुलाला धोका निर्माण होण्याची भिती व्यक्त होत असून महापालिकेने याकडे वेळीच लक्ष घालून हा वटवृक्ष काढून टाकण्याची मागणी होत आहे.

# येळगाव येथील जि.प. प्राथमिक शाळेच्या शिक्षिकेकडून विद्यार्थ्यास बेदम मारहाण; कारवाई करण्याची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)** – अर्धापूर तालुक्यातील येळेगाव येथे शिक्षिकेकडून विद्यार्थ्यास जबर मारहाण करण्यात आली. याप्रकरणी शिक्षिकेवर गुन्हा दाखल करून तिला निलंबित करण्यात यावे, अशी मागणी विद्यार्थ्यांचे नातेवाईक व अनेक संघटनांनी केली आहे.



शनिवारी दि.११ ऑक्टोबर रोजी तोंडी परीक्षेत प्रश्नाचे उत्तर देता येत नसल्याने जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षिकेने वर्ग दुसरीत शिकत असलेल्या संकल्प प्रवीण सावते (वय ७) ह्याला अमानुषपणे मारहाण केली. या प्रकरणात अर्धापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय तपासणी करूनही अर्धापूर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविण्यास टाळाटाळ होत आहे. त्यामुळे या प्रकरणातील दोषी शिक्षिकेवर कठोर कारवाई करून तिला निलंबित करावे, अशी मागणी रिपब्लिकन सेनेचे जिल्हा अध्यक्ष सुनील सोनसळे, जिल्हा उपाध्यक्ष प्रवीण रावणगावकर, महिला आघाडी महासचिव सुकेसणी बुक्तरे, गंगाधर पाईकराव, रिपब्लिकन सेना जिल्हा उपाध्यक्ष अक्षय सावते यांच्यावतीने करण्यात आली आहे.

# किनवट पं. स. गणांचे आरक्षण जाहीर

**किनवट (प्रतिनिधी)** – येथील पंचायत समितीच्या गणांच्या आरक्षणाची सोडत सोमवारी दि. १३ येथील तहसील कार्यालयात प्राधिकृत अधिकारी तथा तहसीलदार डॉ.शारदा चौंडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत काढण्यात आली.

गणनिहाय आरक्षणाचा तपशील असा पुढीलप्रमाणे दहेली : नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, सारखणी : अनुसूचित जमाती, कोठारी सी. नागरिकांचा मागास प्रवर्ग (स्त्री), मांडवी : सर्वसाधारण, मांडवी की. अनुसूचित जमाती (स्त्री), गोकुंदा : अनुसूचित जाती, चिखली बु.: सर्वसाधारण (स्त्री), बोधडी बु : सर्वसाधारण ( स्त्री), जलधारा : अनुसूचित जमाती, परोटी तांडा : अनुसूचित जमाती (स्त्री), इस्लापूर : सर्वसाधारण तर शिवणी गण नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्री) साठी राखीव आहे.



**नांदेड**– शहरातील वामननगर भागात मुख्य रस्त्यालगत असलेली नाली बंद झाल्याने घाण पाणी रस्त्यावर येत होते. भाजपचे नांदेड उत्तर विधानसभा प्रमुख मिलिंद देशमुख यांनी स्वखर्चाने जेसीबी लावून नाली दुरुस्त केली. यावेळी या भागातील ज्येष्ठ नागरिक, कार्यकर्ते उपस्थित होते.

# दीड लाखाच्या दागिन्यांची पर्स लंपास करणाऱ्यास अटक

**नांदेड (प्रतिनिधी)**– मुखेड येथील बसस्थानकावर एका महिलेची दीड लाख रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने असलेली पर्स अज्ञात चोरट्यांनी पळवून नेली होती. मुखेडचे पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे यांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारावर चोरट्यास अटक केली. त्याच्याकडून पळवलेली पर्स व दागिने जप्त करून संबंधित प्रवासी महिलेच्या स्वाधीन केले.

नांदेड शहरातील पांडुरंगनगरातील मीना प्रकाश सूर्यवंशी (वय ३९ व्यवसाय घरकाम रविवारी दि. १२ ऑक्टोबर रोजी कुंद्राळा (ता. मुखेड) येथे चुलत बहिणीच्या मुलाच्या लग्नाला जाण्यासाठी मुखेड बसस्थानकात थांबल्या होत्या. त्या फोनवर बोलत असताना त्या कुंद्राळा बसमध्ये बसल्या. पण त्यांची पर्स बसस्थानकावरच विसरली. त्यांनी लगेच पोलीस ठाणे गाठून तक्रार नोंदविली. त्यावरून पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे यांनी तपास करून आरोपीचा शोध घेतला. त्याच्याकडून पर्स ताब्यात घेतली. पर्समध्ये सोन्या चांदीचे दागिने व रोख असा एकूण १ लाख ५५ हजार रूपयांचा मुद्देमाल आढळून आला. पर्स ही पूर्ण मुद्देमालासह दोन पंचासमक्ष महिलेच्या ताब्यात देण्यात आली आहे. सदर कार्यवाही करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी कौतुक केले आहे.

# दिगंबर जोशी यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)** – शहरातील शिवविजय कॉलनी येथील ज्येष्ठ नागरिक ह.भ.प. दिगंबर धोंडोपंत जोशी बारुळकर महाराज (वय ९३) यांचे दि.१३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दि. १४ रोजी गोवर्धनघाट येथे दुपारी १२:३० वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.



त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, नातवंडे परिवार आहे. नाट्य कलावंत गोविंद जोशी यांचे ते वडिल होत. प्रवचन, कीर्तन, गावागावात मंदिरांची स्थापना अशा अनेक सामाजिक कार्यातही त्यांचा मोलाचा सहभाग होता.

# मनपातील मॉकड्रिलमध्ये कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**नांदेड (प्रतिनिधी)** – जागतिक आपत्ती व धोके निवारण दिनानिमित्त महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयासमोरील प्रांगणात सोमवारी दि.१३ ऑक्टोबर रोजी मॉक ड्रिलचे आयोजन करण्यात आले होते. या मॉकड्रिलला कर्मचाऱ्यांचा चांगला प्रतिसाद लाभला.

आपत्ती ओढवलीच तर तातडीने करावयाच्या उपाययोजना तसेच आपत्ती येऊच नये यासाठी घ्यावयाची खबरदारी याबाबत प्रत्येकाला माहिती असणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने आयोजित करण्यात आलेल्या या मॉकड्रिलला कर्मचाऱ्यांचा चांगला प्रतिसाद लाभला. याप्रसंगी दुर्घटना घडल्यास व्यक्तींचा बचाव व आग लागल्यास विझविण्यासंबंधी प्रात्यक्षिके करण्यात आली. या मॉक ड्रिलमध्ये आग लागणे किंवा भूकंप यांसारख्या आपत्कालीन परिस्थितीत कसे प्रतिसाद द्यायचे, हे तपासण्यात आले. नागरिकांना आणि कर्मचाऱ्यांना सुरक्षितपणे बाहेर कसे काढायचे आणि मदत कशी पुरवायची, याचे प्रशिक्षण देण्यात आले.आपत्कालीन व्यवस्थापनाची तयारी तपासणे आणि आपत्कालीन परिस्थितीत त्वरीत प्रतिसाद देण्याची क्षमता वाढवणे, हा या मॉक ड्रिलचा मुख्य उद्देश असतो. या सरावामुळे लोकांना आपत्कालीन परिस्थितीत काय करावे आणि काय करू नये, याबद्दल मार्गदर्शन मिळाले.

याप्रसंगी महानगरपालिकेचे उपआयुक्त अजितपालसिंघ संधु, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी मिर्झा फरहतुल्ला बेग, अग्निशमन अधिकारी के. जी. दासरे, कार्यकारी अभियंता दिलीप टाकळीकर, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. हनुमंत रिव्वे, उपअग्निशमन अधिकारी निलेश कांबळे, क्षेत्रिय अधिकारी रावण सोनसळे, गौतम कवडे व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.



# लोहा पंचायत समितीचे आरक्षण जाहीर

**लोहा (प्रतिनिधी)** – पंचायत समितीची सार्वत्रिक निवडणूक मागील अनेक कालावधी पासून रखडलेली होती. नुकतेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा कार्यक्रम निवडणूक आयोगाने जाहीर केल्यानुसार दि. १३ रोजी जिल्हा परिषदेसह पंचायत समिती गणांचे आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली.त्यामध्ये एकूण बारा जागा पैकी सहा जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या.

लोहा तहसील कार्यालयात सोमवारी दुपारी तीन वाजता आरक्षण सोडत काढण्यात आली. उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) संजीव मोरे व लोह्याचे तहसीलदार विठ्ठल परळीकर यांच्या उपस्थितीत इयत्ता तिसऱ्या वर्गातील शिवांश पोतदार या विद्यार्थ्यांच्या हस्ते बारा गणांसाठी चिट्ठी काढून आरक्षण सोडत काढण्यात आली. त्यामध्ये एकूण सहा जागा महिलांसाठी राखीव सोडण्यात आल्या. लोहा तालुक्यातील पंचायत समिती गण निहाय आरक्षण सोडत पुढीलप्रमाणे : सर्वसाधारण खुला प्रवर्ग – सोनखेड – (सर्वसाधारण), वाडेपुरी – (महिला), किवळा (बो.)– (सर्वसाधारण), उमरा – (सर्वसाधारण), सावरगाव (न.) – (महिला), कलंबर (बु.) – (महिला), हाडोळी (जा.) – (सर्वसाधारण), नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) – शेवडी (बा.) – (सर्वसाधारण), पेनुर – (महिला), माळाकोळी – (महिला) अनुसूचित जाती प्रवर्ग – मारतळा – (सर्वसाधारण), माळेगांव (यात्रा) – (महिला) असे प्रवर्गनिहाय आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली.

सदरील आरक्षण सोडत कार्यक्रमास निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार संदीप हाडगे यांच्यासह ग्रामीण भागातून विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांची उपस्थिती होती.

# अर्धापूर तालुक्यातील ३ जि.प.गटांचे व ६ पं.स. गणांचे आरक्षण जाहीर; कही खुशी कभी गम

**अर्धापूर (प्रतिनिधी)** – तालुक्यातील लहान जि. प.गट सर्वसाधारण तर मालेगाव, येळेगाव जि.प.गट सर्व साधारण महिला राखीव झाले. तर पंचायत समितीच्या सहा गणांची सोडत तहसील सभागृहात उपजिल्हाधिकारी डॉ.सचिन खल्लाळ तहसीलदार रेणुकादास देवणीकर गटविकास अधिकारी यु.डी.तोटावाड यांच्या उपस्थितीत काढण्यात आली.

गजानन नामदेव मेटकर या बालकांच्या हाताने चिठ्ठी दि.१३ सोमवारी रोजी काढण्यात आली. पंचायत समिती आरक्षण सोडत पंचायत समिती येळेगाव गण सर्वसाधारण पुरुष, पिंपळगाव गण सर्वसाधारण महिला, लहान पं. स. गण अनुसूचित जाती सर्वसाधारण, पार्डी पं. स. गण सर्वसाधारण महिला, मालेगाव पं.स. गण सर्वसाधारण महिला, कामठा पं.स गण नागरीकांचा मागास सर्वसाधारण असे आरक्षण जाहीर होतात.

'काही खुशी कही गम' असे वातावरण सभागृहात दिसून आले. आरक्षण सोडत यशस्वी करण्यासाठी नायब तहसीलदार राजेंद्र शिंदे, सूर्यकांत ताडेवाड, विस्तार अधिकारी डॉ.एस.पी. गोखले, पांडुरंग गर्जे, गिरीष गलांडे यांच्यासह अनेक परिश्रम घेतले. यावेळी भाजप राज्य समिती सदस्य डॉ. लक्ष्मण इंगोले, प्रदेश सदस्य बालाजी स्वामी, माजी जि. प. सदस्य रामराव भालेराव, दत्ता कदम, हजुसींग कामठेकर, जटन मुळे, विठ्ठल काकडे, चंद्रमुनी लोणे, उमाकांत सरोदे, सचिन कल्याणकर, उबाठा तालुकाप्रमुख संतोष कल्याणकर, कपील दुधमल, काँग्रसचे प्रभारी डॉ.उत्तमराव इंगळे, माजी जि. प.सदस्य प्रल्हादराव सोळंके, दत्ता बंडाळे, बंडू धामधरीकर, गजानन मुळे, तालुका उपाध्यक्ष बळीराम हट्टेकर, बालासाहेब देशमुख, भागवत कदम, अॅड. नितीन लोणे, वंचितचे बंटी मोरे, दिपक मगर यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# नांदेड प्रिमियर लीग (एनपीएल) स्पर्धेचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने यावर्षी प्रथमच नांदेड प्रिमियर लीग (NPL) स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत एकूण आठ संघ सहभागी होत असून क्रिकेटप्रेमींसाठी ही स्पर्धा एक आनंदोत्सव ठरणार आहे.

स्पर्धेत पुढील संघांचा समावेश आहे. भूमी वॉरियर्स, लाला लॉयन्स, खुशी स्ट्रायकर्स, हॉटेल कैलास पर्वत, नूर स्ट्रायकर्स, ग्रो अँड ग्लो, अश्वमेध वॉरियर्स आणि रवी भाई टायटन्स या संघांचे लिलाव (ऑक्शन) कार्यक्रमाचे सोमवारी नाना-नानी पार्क, शिवाजी नगर, नांदेड येथील कै. सुधाकरराव डोईफोडे सभागृहात पार पडला. या कार्यक्रमाला सर्व संघमालक, कर्णधार, तसेच क्रिकेट असोसिएशनचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. माधवराव किन्हाळकर (अध्यक्ष, नांदेड जिल्हा क्रिकेट असोसिएशन) हे होते. त्यांच्यासोबत असोसिएशनचे सचिव अशोक तेरकर, शंतनू डोईफोडे, उमाकांत जोशी, तसेच नांदेड जिल्ह्यातील पहिली महिला क्रिकेट पंच शितल पोहरे यांच्यासह अनेक माजी खेळाडूंनी कार्यक्रमास हजेरी लावली. या कार्यक्रमादरम्यान डॉ. किन्हाळकर यांनी सांगितले की, नांदेड जिल्ह्यातील युवा खेळाडूंना आपली गुणवत्ता दाखवण्यासाठी एनपीएल ही एक उत्कृष्ट संधी ठरणार आहे. स्थानिक खेळाडूंना व्यासपीठ देणे आणि स्पर्धात्मक पातळीवर त्यांचा आत्मविश्वास वाढवणे, हेच या उपक्रमामागील मुख्य उद्दिष्ट असल्याचेही डॉ. किन्हाळकर यांनी यावेळी सांगितले.

ऑक्शनच्या माध्यमातून खेळाडूंची निवड, संघरचना आणि रणनीती यामुळे उपस्थित वातावरण उत्साहपूर्ण झाले होते. क्रिकेटप्रेमींमध्ये या स्पर्धेबद्दल मोठी उत्सुकता असून, नांदेडमध्ये पहिल्यांदाच अशा प्रिमियर लीग स्वरूपातील स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असल्याने क्रिकेट चाहत्यांमध्ये याचे स्वागत होत आहे.

# जिल्हा परिषद व पंचायत समिती पदाचे आरक्षण जाहीर

**हदगाव (प्रतिनिधी)** – जिल्हा परिषद सदस्य आरक्षण सोडत दि.१३ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. हदगाव तालुक्यातील १२ पंचायत समिती सदस्य पदाची आरक्षण नियंत्रण अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी अविनाश कांबळे, तहसीलदार पल्लवी टेमकर यांच्या उपस्थितीत तहसील कार्यालयात पार पडले.

हदगाव तालुक्यात एकूण ६ जि.प. गट आहेत. निवघा (बा.) गट अनुसूचित जाती महिलांसाठी, रुई धानोरा गट हा सर्वसाधारण महिला, मनाठा गट नामाप्र महिला, पळसा गट नामाप्र, आष्टी गट नामाप्र व तामसा अनुसूचित जातीसाठी आरक्षित झाला आहे. तसेच पंचायत समितीचे एकूण १२ गण आहे. त्यांचे आरक्षण पुढीलप्रमाणे: तळणी अनुसूचित जाती, निवघा बाजार सर्वसाधारण, रुई अनुसूचित जाती महिला, हरडफ नामाप्र महिला, कोळी नामाप्र महिला, मनाठा अनुसूचित जाती महिला, पळसा सर्वसाधारण, डोंगरगाव सर्वसाधारण, आष्टी अनुसूचित जाती महिला, उमरी (ज.) सर्वसाधारण महिला, तामसा नामाप्र व लोहा गण अनुसूचित जमातीसाठी आरक्षित झाले आहेत.यावेळी नायब तहसीलदार ए. एम. तामसकर, तहसीलदार मुगाजी काकडे, निवडणूक शाखेचे नायब तहसीलदार महेश चामनिकल उपस्थित होते.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४
ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com